महाराष्ट्र विधानपरिषद

पहिले अधिवेशन, २०१८

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

बुधवार, दिनांक २८ मार्च, २०१८ / चैत्र ७, १९४० (शके)

(१) मुख्यमंत्री
(२) गृहनिर्माण मंत्री
(३) कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री

} **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ६४

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामांमध्ये बाधित झालेल्या नागरिकांचे पुनर्वसन करण्याबाबत

(१) * ३८०९३ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील बी.एस.यु.पी. प्रकल्पांतर्गत तयार असलेल्या सदनिकांमध्ये बी.एस.यु.पी. लाभार्थ्यांच्या पुनर्वसनानंतर रिक्त सदनिकांमध्ये महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांमध्ये बाधित झालेल्या नागरिकांचे पुनर्वसन करण्याबाबतचा ठराव महापालिकेच्या महासभेने सभा क्र. ४ विषय क्र. तहकुबी सूचना, ठराव क्र. ३५ अन्वये दिनांक १६ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास पारित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठरावाच्या अनुषंगाने आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी अतिरिक्त मुख्य सचिव, गृहनिर्माण यांना दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास व उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई यांना दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास सविस्तर निवेदन सादर करून महापालिकेच्या महासभेच्या प्रश्न भाग-१ मधील ठरावानुसार बी.एस.यु.पी. योजनेतील रिक्त सदनिका प्रकल्प बाधितांसाठी व संक्रमण शिबिरासाठी वापरण्यास शासनस्तरावर परवानगी मिळण्यासाठी विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) हे खरे आहे.

(३) स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विनंतीवरून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेंतर्गत धोकादायक इमारतीतील ७२ कुटुंबांना बी.एस.यु.पी. तील रिक्त सदनिका तात्पुरत्या स्वरूपात वापरण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

तसेच याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब गृहनिर्माण विभागाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील एम.सी.व्ही.सी. शाळांमधील शिक्षकांना मानधन देण्याबाबत

(२) * ३९१०३ श्री.परिणय फुके : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एम.सी.व्ही.सी. मधील पद भरतीमध्ये ५० टक्के भरतीची अट घातल्याने ज्या शाळेत एक पद आहे तिथे पद भरती करण्यास शासन परवानगी देत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक पद असलेल्या शाळांमधील सर्व पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शाळांमधील शिक्षक कोणतेही मानधन न घेता मागील दोन वर्षांपासून ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन एम.सी.व्ही.सी. शाळांमधील शिक्षकांना मानधन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संभाजी पाटील-निलंगेकर : (१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत +२ स्तरावरील किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रमाकरिता एक पूर्णवेळ शिक्षक तसेच पूर्णवेळ शिक्षक (प्रात्यक्षिक) असे दोन शिक्षक कार्यरत असतात. जर दोन्ही पदे रिक्त झाल्यास ५०% च्या भरती अटीनुसार शिक्षकाचे पद भरले जाते.

वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दिनांक २५/०५/२०१७ अन्वये जे प्रशासकीय विभाग सेवार्थ/शालार्थ प्रणालीतील त्रुटी दुर करुन आकृतिबंध नव्याने अंतिम करुन घेतील त्याच विभागांना वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१,दिनांक ०२/०६/२०१५ च्या शासन निर्णयानुसार पदभरतीस मुभा आहे. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातंर्गत +२ स्तरावरील किमान कौशल्य आधारित व्यवसाय अभ्यासक्रमाच्या अनुदानित संस्थांचा आकृतिबंध अद्यापि नव्याने अंतिम झाला नसल्यामुळे पदभरतीस परवानगी देण्यात आलेली नाही.

(२) उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमांतर्गत (एम.सी.व्ही.सी.) एक पद असलेल्या शाळा नाहीत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

म्हाडाच्या दलित वस्ती सुधार योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

(३) * ३८६४१ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रमाबाई नगर, घाटकोपर येथे दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत ५०० शौचालये उभारण्याचे उद्दिष्ट म्हाडातर्फे ठरविण्यात आले होते परंतु, प्रत्यक्षात ३१८ शौचालये मंडळाने उभारली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शौचालय निर्मितीच्या कामात मोठा गैरव्यवहार झाला असल्याचा ठपका भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कॅग) यांच्या सन २०१३ च्या अहवालात म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याचबरोबर उभारण्यात आलेल्या शौचालयाची कामे वाढल्याने सुमारे २०० कोटी रुपये अतिरिक्त खर्च झाल्याचे कॅगने अहवालात म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाने म्हाडाच्या झोपडपट्टी सुधार मंडळातील संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार गैरव्यवहाराप्रकरणी दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश महेता : (१), (२), (३), (४) व (५) मुख्य अधिकारी, झोपडपट्टी सुधार मंडळाच्या अहवालानुसार रमाबाई नगर, कामराज नगर, घाटकोपर (पूर्व) येथे विविध ठिकाणी ५१० शौचालये बांधण्याचे ठरविण्यात आले होते. जागेच्या उपलब्धतेनुसार ५१० शौचालयापैकी ३१५ शौचालयांचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे, याबाबत भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-१३ च्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालात आक्षेप नमूद

करण्यात आले आहे. ५१० शौचालये बांधण्याचा प्रस्तावास रुपये ५ कोटी १० लक्ष इतक्या रकमेस तांत्रिक मंजूरी देण्यात आली होती, असे म्हाडाने कळविले आहे. महालेखापरिक्षकांच्या अहवालात, उपरोक्त वस्तीत तद्नंतर बांधलेल्या ३८ शौचालयाचे काम पहिल्या कामाबरोबर संलग्न केले असते तर रुपये २३.३९ लाख इतकी बचत झाली असती, असे नमूद केले होते व त्यानुषंगाने लोकलेखा समितीने त्यांच्या २४ व्या अहवालात कामाच्या कार्यान्वयाचे अयोग्य नियोजन झाल्याबद्दल या प्रकरणी सखोल चौकशी करण्याचे निर्देश दिले होते.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ च्या लेखा परिक्षण अहवालात तसेच लोकलेखा समितीच्या शिफारसीनुसार शासन पत्र, दिनांक १६/१२/२०१७ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्यामार्फत सदर प्रकरणी चौकशी ३ महिन्यात पूर्ण करण्यात यावी व त्या संबंधिचा विस्तृत अहवाल व यात काही गैरप्रकार वा अनियमितता आढळल्यास दोषींवर कारवाई करण्याचे शासनाचे निर्देश आहेत. या प्रकरणी अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

महावीर पटवा डेव्हलपर्स ॲण्ड कंस्ट्रक्शन प्रा.लि. कंपनीने सभासदांची फसवणूक केल्याबाबत

(४) * ३८३२१ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जयंत पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारबाव (ता.भिवंडी, जि.ठाणे) या भागात महावीर पटवा डेव्हलपर्स ॲण्ड कंस्ट्रक्शन प्रा.लि. कंपनीने भव्य गृहप्रकल्पाची घोषणा करुन महामार्गालगत तसेच रेल्वे स्थानकांवर जाहिरातबाजी करुन स्वस्त घरांचे आश्वासन देऊन सन २०१० पासून घरांची नोंदणी करुनही गृहप्रकल्पाचे ५% ही काम पूर्ण झाले नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी नोंदणी केलेल्या सभासदांनी घरांचा ताबा मिळत नसल्याने कंपनीच्या संचालकांविरुध्द ठाणे ग्रामीण पोलीस स्थानकात तक्रार दाखल करुन मा.मुख्यमंत्री तसेच मा.गृहनिर्माण मंत्री यांचेकडे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रार व निवेदनाच्या अनुषंगाने सदर कंपनीच्या संचालकांविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच नोंदणी केलेल्या सभासदांना त्यांचे घर अथवा व्याजासह पैसे परत मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय, हे खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा.मुख्यमंत्री तसेच मा.गृहनिर्माण मंत्री यांचेकडे अनुक्रमे दिनांक १३/०९/२०१७ व दिनांक १४/०९/२०१७ च्या लेखी निवेदनाद्वारे तक्रार दाखल केली आहे.

(३) श्री.महावीर पटवा डेव्हलपर्स ॲण्ड कंस्ट्रक्शन प्रा.लि. कंपनीचे संचालक व इतर लोकांविरुध्द भिवंडी ता. पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामीण येथे गु.र.क्र. २०४/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४६५, ४६७, ४६८, ४७१ सह महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिका अधिनियम सन १९६३ चे कलम ३(अ), ८(अे), १३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात ४ आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यापैकी २ मुख्य आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले आहे. अटक २ आरोपींचे सर्व बँक खाती सील करण्यात आले असून या गुन्ह्यात निष्पन्न झालेली ६० एकर जमीन ताब्यात घेण्याची कायदेशीर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गोखिवरे (ता.वसई, जि.पालघर) येथील आदिवासींच्या जागेवर इमारती उभारल्या जात असल्याबाबत

(५) * ३७८३६ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोखिवरे (ता.वसई, जि.पालघर) येथील आदिवासींची मालकी असलेल्या सर्व्हे क्र. १२७ हिस्सा नं. ३ व १(पै)अ या जागेवर १० ते १२ अनधिकृत बहुमजली इमारती कोणतीही परवानगी न घेता उभारल्या जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सामाजिक कार्यकर्ते श्री.जितेंद्र शिंदे यांनी आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार करुन आदिवासींची जागा मोकळी करण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांच्याकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) सर्व्हे क्र. १२७ हिस्सा नं. ३ व १ (पै) अ वर एकूण ६ पूर्ण इमारती (G+४ च्या चार इमारती, G+३ ची एक इमारत व G+१ ची एक इमारत) व एका इमारतीच्या प्लिंथचे अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) खरे आहे.

श्री.जितेंद्र शिंदे यांनी आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांचेकडे सदर अनधिकृत बांधकामाविरुध्द कारवाई करुन व्यावसायिकांवर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना (MRTP) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करुन नागरीकांचे नुकसान टाळावे अशा स्वरूपाचा तक्रार अर्ज दिनांक ०५/१०/२०१७ रोजी केला आहे.

(३) वसई-विरार शहर महानगरपालिकेने सदर बांधकामाचे विकासकाविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमाच्या कलम ५२, ५३, ५४ अन्वये नोटीस देऊन दिनांक २०/०५/२०१६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

तसेच वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत दिनांक १९/१२/२०१६ रोजी G+३ इमारतीच्या एका विंगवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

सदर प्रकरणी विकासकाने वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विरोधात दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वसई येथे केलेल्या दाव्यामध्ये उक्त अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई संदर्भात दिनांक ३०/११/२०१५ रोजी संबंधित न्यायालयाने मनाई हुकूम दिला आहे.

सदर मनाई हुकूम उठविण्याचे प्रयत्न वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात कार्यरत असलेल्या मायक्रो फायनान्स कंपन्या बेकायदेशीपणे कर्ज वाटप करीत असल्याबाबत

(६) * ३८४२१ श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक ३४०२९ ला दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कार्यरत असलेल्या बहुतांश मायक्रो फायनान्स कंपन्यानी अनेक कर्जदारांस बेकायदेशीपणे कर्जाचे वाटप केले असून या कंपन्याच्या वसुली ठेकेदारांनी सध्या अशा प्रकारच्या कर्ज वसुलीसाठी विविध गैरमार्गाचा वापर सुरु केला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्जाच्या वसुलीसाठी बहुतांश फायनान्स कंपन्यानी ग्रामीण भागातील महिला बचतगटांना लक्ष्य केले असल्याने कर्जाच्या तगादामुळे कर्जदार व वसुलीदार यांच्यामध्ये वाद सुरु असल्याने ग्रामीण भागातील

महिलांमध्ये असलेला सामाजिक एकोपा यामुळे नष्ट होत असल्याने उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) राज्यात कार्यरत असलेल्या बहुतांश मायक्रोफायनान्स कंपन्यांनी अनेक कर्जदारास बेकायदेशीरपणे कर्जाचे वाटप केले असून या कंपन्याच्या वसुली ठेकेदारांनी सध्या अशा प्रकारच्या कर्ज वसुलीसाठी विविध गैरमार्गाचा वापर सुरू केला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले नाही. तथापि, यापुर्वी राज्यातील मायक्रोफायनान्स कंपन्यासंदर्भात राज्यामध्ये विविध पोलीस ठाण्यामध्ये एकूण ०६ गुन्हे दाखल आहेत.

राज्यातील मायक्रोफायनान्स कंपन्यांच्या विनातारण कर्ज वाटपाबाबत चौकशी करण्यासाठी गृह विभाग शासन निर्णय क्रमांक लवेसु-१२१६/प्र.क्र.४/शिकाना/पोल-१३, दिनांक १२ एप्रिल, २०१७ अन्वये विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय समितीची स्थापना करण्यात आली असून सदर प्रशासकीय समितीचे चौकशी अहवालाचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच, राज्यातील काही लघु वित्तीय संस्था लोकांना दिलेले कर्ज वसुली करताना लोकांना धाकदपटशा करणे, धमक्या देणे, दिलेले कर्ज जबरदस्ती वसुल करणे (Coercive methods) असे प्रकार करत असतील तर अशा लघु वित्तीय संस्थाविरूध्द कायदेशीर कारवाई करणेबाबत सर्व विभागीय आयुक्त आणि पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना शासनाचे दिनांक १३ एप्रिल, २०१७ चे पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबई येथील आंतरराष्ट्रीय स्मारकाबाबत

(७) * ३८१२३ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (मुंबई) येथील इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या भव्य स्मारकाच्या रुपये ६०० कोटी इतक्या अंदाजित रकमेच्या प्रस्तावास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकाच्या बांधकामाकरिता रचना व बांधणी या तत्वावर निविदा मागविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त स्मारक उभारण्यासंबंधीची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय व सुयोग्य कंत्राटदारास बांधकामाचे काम सुपूर्द करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार स्मारकाचे बांधकामाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय.

सदर स्मारकाच्या बांधकामासाठी रक्कम रुपये ७६३.०५ कोटी इतक्या अंदाजित रक्कमेस सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

(२) होय.

(३) होय.

दिनांक ०९/०२/२०१८ रोजी कार्यारंभ आदेश देणेत आलेले आहेत. प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील जेष्ठ नागरिकांच्या सुरक्षेबाबत

(८) * ३७८१८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या गृह खात्याने जाहीर केलेल्या (क्राईम इन-२०१६) या अहवालानुसार देशात जेष्ठ नागरिकांवरील गुन्हयात महाराष्ट्र राज्यामध्ये लक्षणीय वाढ झाली असून गत वर्षात जेष्ठ नागरिकांबाबत ४ हजार ६९४ गुन्हे दाखल झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जेष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

देवेंद्र फडणवीस : (१) सन २०१६ मध्ये महाराष्ट्रात ज्येष्ठ नागरिकांबाबत ४ हजार ६९४ गुन्हे दाखल झाले आहे.

(२) ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक (का. व सु.) यांचे स्तरावरुन दिनांक २८/०१/२०१३ व दिनांक १६/१०/२०१५ च्या परिपत्रकान्वये ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेबाबत काळजी घेण्याबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात रियल इस्टेट कंपन्या स्वस्त दरात भूखंडाचे आमिष दाखून सामान्य जनतेची फसवणूक करीत असल्याबाबत

(९) * ३९१८३ श्री.प्रकाश गजभिये, ॲड.अनिल परब : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सदनिका, भूखंड, इमारत किंवा स्थावर संपदा प्रकल्पाच्या निर्मिती तसेच विक्री व्यवहारात पारदर्शकता यावी तसेच यासंबंधीच्या तक्रारीचे जलदगतीने निवारण करता यावे यासाठी शासनाने स्थापन केलेल्या महाराष्ट्र रियल इस्टेट नियामक प्राधिकरण (महारेरा) चे कामकाज सुरु झाल्यानंतरही बांधकाम व्यावसायिकांकडून ग्राहकांची फसवणूक करण्याच्या घटना घडत असून अशा तक्रारीमध्ये वाढ झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रियल इस्टेट कंपन्यांनी स्वस्त दरात भूखंडाचे आमिष दाखून सामान्य व गोरगरीब जनतेची करोडो रुपयांची फसवणूक केली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश महेता : (१), (२) व (३) हे खरे नाही.

महारेरा किंवा शासनाकडे अशा स्वरुपाच्या कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे कर निर्धारक व संकलक यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

(१०) * ३७८९३ ॲड.अनिल परब : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर निर्धारक व संकलक श्री.अनिल हरीभाऊ लाड यांनी अतिरिक्त आयुक्त यांचे हरकती नंतर वरिष्ठाची मंजूरी नसताना तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात तरतुद नसतांना तसेच अधिकार नसतांना विकासकांशी अर्थपूर्ण व्यवहार करुन माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान स्वतः च्या अधिकारात "ना-हरकत" दाखले देऊन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे कोटयवधी रुपयाचे नुकसान केल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर निर्धारक व संकलक श्री.लाड यांनी दिलेल्या १९ ना-हरकत दाखल्यापोटी एकूण रक्कम रुपये २.६१ कोटी वसूल झाले असून या १९ मालमत्तापोटी सन २०१४-१५ चे थकीत मालमत्ता कर रुपये १.१५ कोटी व सन २०१५-१६ चे रुपये ५.०३ कोटी व दंड रुपये ०.६१ कोटी असे एकूण रुपये ६.८३ कोटी मालमत्ता कर वसुल होणे बाकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिनियमांतील तरतूदीशी विसंगत असलेले ना-हरकत दाखले दिल्याने मालमत्ता कर वसुलीवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे परिणाम होत असून थकीत रक्कम ही थकीतच राहण्याची शक्यता वर्तविली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त गैरव्यवहाराची शासनाने चौकशी करुन दोषी व्यक्तींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) मालमत्ता कर थकबाकी नसल्याबाबतचा दाखला देण्याचे अधिकार संगणकीय प्रणालीनुसार कर निर्धारक व संकलक यांना आहेत.

तथापि, तत्कालीन कर निर्धारक व संकलक यांनी मालमत्ता कराची संपूर्ण वसूली नसताना वरिष्ठांच्या मान्यतेविना एकूण १९ जमीन मिळकत धारकांना ना-हरकत दाखले दिले, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) उपरोक्त नमूद १९ ना-हरकत दाखले देताना मालमत्ता कराची एकूण रूपये ६.०४ कोटी इतकी रक्कम थकीत होती, ही वस्तुस्थिती आहे.

सदर रुपये ६.०४ कोटी रक्कमेपैकी रुपये ४.१२ कोटी मार्च, २०१६ पर्यंत वसूल करण्यात आले आहेत.

तद्नंतर उर्वरीत रुपये १.९२ कोटी इतकी शिल्लक रक्कम व्याजासह वसूल करण्यात आली असून ती रुपये २.३७ कोटी इतकी आहे.

(४) सदर प्रकरणी चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल शासनास १० दिवसात सादर करण्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

शिवसाई गृहनिर्माण संस्थेने झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाकडे दिलेल्या तक्रार अर्जाबाबत

(११) * ३८९०५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई मधील जिजामाता रहिवाशी संघ (रजि) आझादनगर अंधेरी (पूर्व) यांनी शिवसाई गृहनिर्माण संस्थेच्या प्रारुप परिशिष्ट-२ च्या मान्यतेसंबंधी हरकत असल्याबाबतचा तक्रार अर्ज दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अर्जातील तक्रारींचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश महेता : (१) "जिजामाता रहिवाशी संघ" या नावाने उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी, अंधेरी-१ यांना सदर निवेदन अग्रेषित असून निवेदनाची प्रत अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पश्चिम उपनगरे व मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना देण्यात आलेली दिसून येते.

(२) सदर तक्रार अर्जान्वये "जिजामाता रहिवाशी संघ" यांनी नियोजित शिवसाई गृहनिर्माण संस्थेच्या प्रारुप परिशिष्ट-२ च्या संदर्भात काही आक्षेप उपस्थित केले आहेत. स्थानिक झोपडीधारकांची सार्वजनिक सभा न घेणे, विकासकाला ७०% झोपडीधारकांची संमती न घेणे, योजनेत सुरु असलेल्या गैरव्यवहार व भ्रष्टाचारासंदर्भात, सदर योजनेत समाविष्ट असलेल्या भूखंडाच्या नियोजित हद्दीत तफावत असल्याबाबत, सदर संस्थेच्या परिशिष्ट-२ मध्ये अनधिकृत झोपडीधारकांचा समावेश करण्यात आल्याबाबत

तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडे चालु असलेल्या सुनावणीचा निकाल जाहिर होईपर्यंत परिशिष्ट-२ पारित करण्यास स्थगिती देण्याबाबत सदर तक्रार अर्जान्वये विनंती करण्यात आली आहे.

(३) सदर तक्रार अर्ज पुढील कार्यवाहीसाठी उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी, अंधेरी-१ यांचेकडे पाठविण्यात आला असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे वाघोली (ता.हवेली, जि.पुणे) येथील मतदार यादीमध्ये केलेल्या गैरप्रकाराबाबत

(१२) * ३७९६५ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाघोली (ता.हवेली, जि.पुणे) येथील मतदार यादीमध्ये गैरप्रकार केल्याप्रकरणी सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, हवेली यांच्यावर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.महसूल मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) भारत निवडणुक आयोग, नवी दिल्ली यांनी रितसर कार्यक्रम जाहिर करून लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० अंतर्गत व तद्नुषंगिक तरतुदी अंतर्गत मतदार नोंदणी कार्यक्रम राबविणेत येत असल्याने व सदर प्रकरणी प्राप्त तक्रारी मध्ये चौकशीमध्ये तथ्य आढळून आले नाही. यास्तव संबंधितांवर जबाबदारी निश्चितीचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील कामगार नोंदणी अभावी शासकीय सुविधांपासून वंचित असल्याबाबत

(१३) * ३८७४७ श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इमारत बांधकाम कामगार, बंदर कामगार तसेच विविध कामांसाठी मुंबईतील नाक्यांवर उभे राहणारे असंख्य कामगार नोंदणी अभावी शासकीय सुविधांपासून वंचित असल्याने भारतीय सेवा नाका कामगार संघटनेने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जनजागृती अभियान राबविले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अभियानात शासनाकडे एक लेखी निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनात कोण-कोणत्या मागण्या करण्यात आल्या आहेत,

(४) असल्यास, उक्त मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संभाजी पाटील-निलंगेकर : (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे. दिनांक ३ जानेवारी, २०१८ च्या पत्रान्वये कामगारांच्या मागणीबाबत बैठक लावण्याची विनंती केली आहे.

(३) संघटनेच्या निवेदनामध्ये खालील मागण्या करण्यात आल्या आहेत -

१) राष्ट्रसंत सेवालाल महाराज यांच्या नावाने नाका व असंघटीत कामगारांचे स्वतंत्र कामगार महामंडळ स्थापन करावे.

२) नोंदणीसाठी ९० दिवसांची अट शिथिल करुन ती ३० दिवसांची करावी, यासाठी कायद्यात दुरुस्ती करावी.

३) कामगारांच्या विकासासाठी असलेला निधी इतर कोणत्याही कामासाठी खर्च करता येणार नाही यासाठी एक धोरण आणावे.

४) मुंबईच्या विकास आराखडयात सर्व असंघटीत कामगारांच्या वस्त्यांचे नियोजन करुन त्यांच्यासाठी हक्काची घरे द्यावीत.

५) नाका कामगारांसाठी स्वतंत्र घरकुल धोरण जाहीर करावे. अर्थसंकल्पात स्वतंत्र आर्थिक तरतूद करावी.

६) नाका कामगारांना रोजगार हमीचे संरक्षण द्यावे, सर्वांना जीवन विमा व आरोग्य विमा योजना योग्यरित्या राबवावी.

७) बांधकामाची सर्व कंत्राटे ही नाका कामगार संघटनांना देण्यात यावीत.

८) लोकप्रतिनिधींच्या निधीतून नाका कामगारांसाठी शेड उभारणे.

९) कामगारांच्या नोंदीसाठी बिल्डरांकडूनच सक्तीची करावी. नोंद न करणाऱ्या बिल्डरांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत.

१०) राज्यातील सर्व नाका कामगारांची आणि ते उभे रहात असलेल्या नाक्याची नोंद व्हावी. नाका कामगारांना ओळखपत्र बनवून द्यावीत.

(४) राज्यामध्ये बांधकाम कामगारांसाठी ज्यामध्ये नाका कामगारांचा समावेश आहे, त्यांच्यासाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली असून इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ च्या कलम ३(१) नुसार १% दराने मंडळाकडे उपकर जमा करण्यात येतो.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळांतर्गत नोंदित पात्र बांधकाम कामगार आणि त्यांच्या पाल्यासाठी खालील योजना राबविण्यात येत आहेत.

अ) पुरुष बांधकाम कामगाराच्या पत्नीस/स्त्री बांधकाम कामगाराच्या पतीस आणि त्यांच्या पाल्यासाठी शैक्षणिक योजना.

ब) बांधकाम कामगार आणि त्यांच्या कुटुंबासाठी वैद्यकीय योजना.

क) बांधकाम कामगारांच्या विवाहाकरिता अर्थसहाय्य.

ड) बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबाकरिता महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य विमा योजना.

इ) बांधकाम कामगारांसाठी कौशल्यवृध्दी प्रशिक्षण.

फ) बांधकाम कामगारांना घरबांधणीकरिता अर्थसहाय्य.

ज) बांधकाम कामगारांना अवजारे खरेदी करण्याकरिता अर्थसहाय्य.

इतर मागण्यांबाबत तपासून उचित कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वडारवाडी (पुणे) येथील झोपडपट्टी पुनर्वसनाबाबत

(१४) * ३८७७३ श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे मधील वडारवाडी येथील हनुमाननगर कॉर्नरजवळील वस्तीमध्ये राहत असलेल्या बाराशे कुटुंबियांनी त्यांचा घरांचा विकास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत न करता वाल्मिकी आवास योजना किंवा घरकुल योजनेंतर्गत करावा या मागणीसाठी मोर्चा काढून एस.आर.ए. व उपजिल्हाधिकारी यांना निवेदन दिल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार वडारवाडी येथील रहिवाशांच्या पुनर्वसनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश महेता : (१) महाराष्ट्र वडार समाज शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे यांनी दिनांक ०९/१०/२०१७ रोजी या आशयाचे निवेदन सादर केलेले आहे. तथापि, वडारवाडी येथील हनुमाननगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा प्रस्ताव सद्य:स्थितीत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांच्याकडे प्राप्त नसल्याचा प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(२) व (३) झोपडीधारकांच्या सर्वेक्षणाचे काम प्राधिकरणाने सुरु केले आहे. सर्वेक्षणानंतर झोपडयांची संख्या निश्चित झाल्यानंतर पुनर्वसन योजना घेणे शक्य होईल.

मुख्याधिकारी, नगरपरिषद हिंगोली यांनी राजकीय पक्षाच्या प्रचारात सक्रीय सहभाग घेतल्याबाबत

(१५) * ३९२६२ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर (जि.नांदेड) नगरपालिका निवडणुकीत राजकीय पक्षाच्या प्रचारात सक्रीय सहभाग घेतला म्हणून श्री.रामदास पाटील, मुख्याधिकारी, नगरपरिषद हिंगोली यांची उपविभागीय अधिकारी, देगलूर यांनी केलेल्या चौकशीत ते दोषी आढळून आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.पाटील यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील तरतूदीचा भंग केला असल्यामुळे त्यांचेवर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, देगलूर यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालात श्री.रामदास पाटील, मुख्याधिकारी, नगरपरिषद हिंगोली यांनी नगरपालिका निवडणुकीत राजकीय पक्षाच्या प्रचारात सहभाग घेतल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले.

उक्त चौकशी अहवालाच्या अनुषंगाने श्री.रामदास पाटील, मुख्याधिकारी, नगरपरिषद हिंगोली यांचा खुलासा घेण्यात आला.

श्री.पाटील यांच्या खुलाशात नमूद बाबींच्या अनुषंगाने, विभागातील सहसचिव व उपसचिव यांची व्दिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली असून, त्यांच्यामार्फत चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वाशी (नवी मुंबई) येथील रुग्णालयाच्या स्वच्छतेसाठी वापरल्या जाणाऱ्या रसायनाच्या देयकात गैरव्यवहार केल्याबाबत

(१६) * ३९२८८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी (नवी मुंबई) येथील रुग्णालयाच्या स्वच्छतेसाठी ८ हजार लिटर रसायन वापरले मात्र ३९ हजार लिटर रसायन वापरल्याचे देयक घेऊन गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कंत्राट देणारे अधिकारी व कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) नवी मुंबई महानगरपालिकेत यांत्रिकी पध्दतीने रूग्णालयीन साफसफाईच्या कामात झालेल्या भ्रष्टाचाराबाबत, श्री.संजयकुमार सुर्वे यांनी दिनांक ०४/०१/२०१८ रोजी मा.मुख्य सचिव यांचेकडे तक्रार दाखल केली आहे.

सदर तक्रारीस अनुसरून आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचेकडून सविस्तर अहवाल मागविण्यात आला.

आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचा अहवाल दिनांक २३/०२/२०१८ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे.

सदर अहवालाची छाननी करून आवश्यकतेनुसार संबंधितांवर कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

डोंबिवली औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत

(१७) * ३९३९७ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली येथील औद्योगिक वसाहतीत माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान बॉयलरचा स्फोट होवून १२ जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणी शासनाने तत्कालीन जिल्हाधिकारी, ठाणे यांनी चौकशी करुन अहवाल सादर करण्याचा आदेश दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही जिल्हाधिकाऱ्यांनी सदर अहवाल सादर केला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसाहतीतील १९९ कारखान्यांमध्ये नियमबाह्यरित्या कामे करण्यात येत असून डोंबिवली औद्योगिक परिसरातील टप्पा-१ व टप्पा-२ मध्ये दोन लाख नागरीकांच्या जिवीतास धोका असल्याने सदर कारखाने बंद करण्याबाबत मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संभाजी पाटील-निलंगेकर : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीने दिनांक २४/०७/२०१७ रोजी चौकशी अहवाल शासनास सादर केला असून अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने सर्व संबंधित विभागाकडून अभिप्राय/अहवाल मागविण्यात आला आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी वादी श्री.नंदकुमार पवार यांनी डोंबिवली औद्योगिक परिसरातील १९९ कारखान्यांना, MIDC कायद्यांतर्गत पूर्णत्वाचे प्रमाणपत्र न दिल्याबाबत तसेच महाराष्ट्र रिजनल ॲण्ड टाऊन प्लॅनिंग अधिनियम, १९६६ च्या नियम भंगाबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका क्र.८३७२/२०१७ (स्टँप क्र.१६४८७/२०१७) दाखल केली आहे. त्यामध्ये उद्योग विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जिल्हाधिकारी, ठाणे, पोलीस आयुक्त, ठाणे हे प्रतिवादी आहेत. सदर याचिका न्यायप्रविष्ठ आहे.

या संदर्भात म.औ.वि.महामंडळाने बांधकाम पूर्णत्वाच्या दाखल्याबाबत तपासणी केली असता त्यांना सद्य:स्थितीमध्ये एकूण ४६ भूखंडधारकांनी अद्यापही, पूर्णत्वाचा दाखला घेतला नाही व महामंडळाने यासंदर्भात अशा भूखंडधारकांना नोटीसेस दिल्या आहेत.

वर उल्लेख केलेल्या ४६ कारखान्यांपैकी ३९ कारखाने, कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत नोंदणीकृत आहेत. त्यापैकी ३७ कारखाने चालू असून २ कारखाने बंद झालेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

चांदवड (जि.नाशिक) येथे ग्रामीण पोलिसांनी शस्त्रसाठा जप्त केल्याबाबत

(१८) * ३९४७० डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदवड (जि.नाशिक) नजिक मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील टोलनाक्याजवळ दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास ग्रामीण पोलिसांनी कार्यवाही करून बोलेरो गाडीतून मोठा शस्त्रसाठा जप्त केला व याप्रकरणी चांदवड पोलीस ठाण्यात शस्त्रास्त्र प्रतिबंधक कायदा कलम ३, ७/२५ तसेच भा.दं.वि. ३५३, ४६८, ४८३ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शस्त्रसाठा प्रकरणात ४ संशयितांना पोलिसांनी अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषी गुन्हेगारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी एकूण ८ आरोपीविरुध्द दिनांक १४/१२/२०१७ रोजी गुरनं. ३०६४/२०१७ भारतीय हत्यार कायदा कलम ३, ७ चे उल्लंघन २५ सह भा.दं.वि. कलम ३५३, ४६८, ४८३, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामधील ७ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. एक आरोपी हा विधी संघर्षित बालक असून त्यास ताब्यात घेवून दिनांक १९/१२/२०१७ रोजी मा.प्रधान न्यायाधिश, बाल न्याय मंडळ, उंटवाडी रोड, नाशिक यांचेकडे हजर केलेले आहे. तपासामध्ये सदर आरोपी निर्ढावलेले व सराईत गुन्हेगार असल्याचे दिसून आल्याने सदर गुन्ह्यांस महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(२), ३(४) हे वाढीव कलम दिनांक २७/१२/२०१७ रोजी लावण्यात आले असून सदर गुन्ह्याचा तपास अद्याप चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे येथील गिरीराज हाईट या इमारतीला लागलेल्या आगीच्या घटनेबाबत

(१९) * ४०५४७ श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील हरिनिवास सर्कल मधील २६ माळयाच्या गिरीराज हाईट या इमारतीच्या डक्टमध्ये शॉर्टसर्किट झाल्यामुळे दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास भीषण आग लागली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील आगीच्या घटनेत जिवीत व वित्तीय हानी झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त आगीच्या घटनेत किती वित्तीयहानी झाली आहे व आगीत जखमी झालेल्यांना शासनाने कोणती आर्थिक मदत दिली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) दिनांक १९/०१/२०१८ रोजी गिरीराज हाईटच्या चौथ्या मजल्यावरील इलेक्ट्रीक डक्टमध्ये शार्टसर्कीटमुळे आग लागली, ही वस्तुस्थिती आहे.

सदर आग डक्टमध्ये असलेल्या भंगार सामानामुळे सव्वीसाव्या मजल्यावरील डक्टपर्यंत पोहचली.

अग्निशमन दलाने तातडीने कार्यवाही करुन सदर आग एका तासाच्या आत विझवली तसेच सर्व रहिवाशांना सुरक्षित बाहेर काढले.

यामध्ये कोणतीही जिवीत हानी झालेली नाही. तसेच कोणीही जखमी झालेले नाही. इलेक्ट्रीक डक्ट व्यतिरीक्त इतर कोणतीही वित्तीयहानी झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मा.मुख्यमंत्री यांच्या सुरक्षित प्रवासाबाबत

(२०) * ३९७४५ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा-भाईंदर येथील एका कार्यक्रमाच्यावेळी मा.मुख्यमंत्री यांचे हेलिकॉप्टर अपघातातून बचावल्याची घटना दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास घडली असून याप्रकारची घटना ही गत काही महिन्यातील चौथी घटना आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेचा चौकशी अहवाल केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांच्या हेलिकॉप्टरला वारंवार अपघात होत असल्याच्या पार्श्वभूमीवर हेलिपॅडसाठी नवे धोरण आखण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार मा.मुख्यमंत्री यांच्या सुरक्षित प्रवासाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) नाही.

(३) होय.

(४) अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या विमान प्रवासासाठी अधिक दक्षता घेण्याच्यादृष्टीने शासन निर्णय क्र.विचासं-१११८/प्र.क्र.१४/२८-अ, दिनांक २५ जानेवारी, २०१८ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या असून त्यानुसार अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या उड्डानासंदर्भात मापदंड निश्चित करण्यात आले आहे. ज्यामध्ये वेगवेगळया विभाग/विभागप्रमुखांच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कामोठा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील श्री अजिंक्यतारा व ब्ल्यु हेवन इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

(२१) * ४०००५ श्री.जयंत पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामोठा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील श्री अजिंक्यतारा व ब्ल्यु हेवन या इमारतींचे बांधकाम विकासकाने निकृष्ट दर्जाचे केल्यामुळे सदरील इमारती धोकादायक असल्याचे पनवेल महानगरपालिकेने घोषित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेक्टर ७ मध्ये असलेल्या श्री अजिंक्यतारा इमारतीचे बांधकाम युवराज डेव्हलपर्स विकासकाने व ब्ल्यु हेवन इमारतीचे बांधकाम पुनित कंस्ट्रक्शन विकासकाने केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निकृष्ट बांधकाम केल्यामुळे श्री अजिंक्यतारा इमारतीतील ५४ कुटुंबे व ब्ल्यु हेवन इमारतीतील १६८ कुटुंबे बेघर होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार निकृष्ट बांधकाम करणाऱ्या उक्त विकासकांवर महापालिकेने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१), (२), (३) व (४)

- अजिंक्यतारा व ब्ल्यु हेवन या इमारतीच्या सर्व परवानग्या सिडकोमार्फत देण्यात आलेल्या आहेत. तसेच अजिंक्यतारा सोसायटीस दिनांक १६/०८/२००२ रोजी तर ब्ल्यु हेवन सोसायटीस दिनांक २०/०२/२००६ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहेत.
- ब्ल्यु हेवन सोसायटीने निष्कृट बांधकामाबाबत दिनांक २३/०३/२०१० रोजी सिडकोकडे तक्रार केली असता, त्यांनी सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याबाबत तसेच याबाबत ग्राहकमंचाकडे तक्रार करण्याचे त्यांना कळविले आहे.
- दरम्यान पनवेल महानगरपालिकेने उपरोक्त दोन्ही इमारतीची प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता, सदर इमारती धोकादायक असल्याचे आढळून आले.
- पनवेल महानगरपालिकेने वित्तीय व जीवितहानी टाळण्यासाठी ब्ल्यु हेवन इमारतीस दिनांक १४/०६/२०१७ रोजी व अजिंक्यतारा इमारतीस दिनांक ०५/०९/२०१७ रोजी इमारत धोकादायक असल्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६४ अन्वये नोटीस बजावली आहे.
- स्ट्रक्चरल ऑडीटचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महापालिकेच्या शाळांमधील ई-लर्निंग प्रकल्पाबाबत

(२२) * ४०१५२ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक ३२०८६ ला दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेच्या शाळांमध्ये मुलभूत सुविधांची कमतरता असतानाही प्रशासनाकडून रुपये २१ कोटी खर्च करुन ई-लर्निंग प्रकल्प राबविण्यात येणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पातील डिजीटल अभ्यासक्रमास राज्य मंडळाचा (एस.एस.सी.बोर्ड) अभ्यासक्रमात तयार करणाऱ्या बालभारतीची मान्यता मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त महापालिकेच्या शाळांमध्ये मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) पुणे महानगरपालिकेच्या शाळांतील ई-लर्निंग प्रणाली, व्हर्च्युअल क्लासरूम, डिजीटल क्लासरुम व अडॅप्टीव्ह लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम योजना राबविण्यासाठी रुपये २०.९९ कोटीच्या प्रस्तावास पुणे महानगरपालिकेच्या मुख्यसभेने दिनांक २१/०२/२०१८ रोजी मंजूरी दिलेली आहे, हे खरे आहे.

(२) सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षाकरीता शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी बालभारतीने प्रमाणित केलेले सॉफ्टवेअर खरेदी करण्याबाबत सूचित केले होते. तथापि, बालभारतीकडे सदरचे सॉफ्टवेअर प्रमाणित करून देण्याची सुविधा उपलब्ध नसल्याने मान्यता घेता आलेली नव्हती.

(३) याप्रकरणी चौकशी करण्याबाबत पुणे महानगरपालिकेस दिनांक २१/०७/२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. सदरचा चौकशी अहवाल पुणे महानगरपालिकेकडून फेब्रुवारी, २०१८ अखेर प्राप्त झाला असून शासनस्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बदलापूर (जि.ठाणे) येथील नाट्यगृहाच्या बांधकामाबाबत

(२३) * ४०६०९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) या "अ" वर्ग दर्जा असलेल्या नगरपरिषदेकरिता शासनाने दिनांक २९ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास वैशिष्टपूर्ण अनुदानातून प्रशासकीय इमारत व नाट्यगृह बांधण्यासाठी रुपये १४.१४ कोटीचा निधी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्याकडे सुपूर्द केला असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अनुदानातून मिळालेल्या १४.१४ कोटी रुपयांच्या निधीचा वापर त्याच आर्थिक वर्षात करणे बंधनकारक असतानाही सदर कामासाठी काहीही रक्कम तीन वर्षात खर्च केली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बदलापूर (पूर्व) येथील कात्रप विद्यालयाच्या बाजूला नाट्यगृहाचे आरक्षण विकास आराखड्यामध्ये मंजुर केले असून सदर आरक्षण ताब्यात घेण्याची प्रक्रिया केली नसल्याने नाट्यगृहासाठीचा निधी वापराविना वर्षभर पडून राहिल्याने सन २०१७ मध्ये हा निधी व्यपगत झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांविरुध्द कारवाई करुन नाट्यगृहाच्या बांधकामाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३)

- कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेस सन २०१४-२०१५ मध्ये प्रशासकीय इमारत व नाटयगृह इ. कामांच्या बांधकामाकरिता शासनाने रुपये १४.१४ कोटी निधी मंजूर करण्यात आला होता.
- सदर निधीचा वापर ३१ मार्च, २०१६ अखेर करणे आवश्यक होते ही बाब खरी आहे.
- सदर दोन्ही कामांच्या जागा नगरपरिषदेकडे उपलब्ध न झाल्याने सदरचा अखर्चित निधी शासन जमा करण्याबाबत दिनांक २९/५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांना कळविण्यात आले आहे.
- प्रशासकीय इमारतीची जागा नगरपरिषदेच्या ताब्यात असून, सदर ठिकाणी इमारत बांधकामाकरिता झाडे तोडण्याची कार्यवाही सुरु असताना स्थानिक नागरीकांनी मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.१५८/२०११ दाखल केली.
- सदर प्रकरणी मा.न्यायालयाने स्थगिती दिली असून, प्रकरण अद्याप न्यायप्रविष्ट आहे.
- नाटयगृह आरक्षणाखालील ७९६७ चौ.मी. जागा खाजगी मालकीची असून, सदर जागा मालकाशी वाटाघाटीने जागा संपादनाची कार्यवाही नगरपरिषद स्तरावरुन सुरु होती. तथापि, सदरची जागा नगरपरिषद संपादित करु शकली नाही.

(४) प्रश्नाधीन कामांच्या दोन्ही जागेवर न्यायालयीन प्रकरण व खाजगी जागा मालकाकडून भूसंपादन या कारणाने कामास सुरुवात होऊ शकली नाही.

भविष्यात सदर कामाकरिता जागा उपलब्ध झाल्यास उपलब्ध वित्तीय तरतूद विचारात घेवून नाटयगृह बांधकामाबाबत उचित विचार करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री कल्लेश्वर देवस्थान, कोथळी (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) देवस्थान मालकीच्या जमिनीबाबत

(२४) * ४०९१० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री कल्लेश्वर देवस्थान, कोथळी (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) देवस्थानाच्या मालकीच्या जमीन गट क्र. ८६५ या जमिनीचा जाहिर लिलावाकरीता महसूल विभागाचा दिनांक २०/०३/१९५९ चा शासन निर्णय उत्पन्न वाढीच्यादृष्टीने रद्द करुन प्रस्ताव फेरसादर करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २ एप्रिल, २०१६ रोजी महसूल विभागास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने राज्यातील देवस्थानाच्या जमिनी संदर्भात शासनाची भूमिका ठरविण्यासाठी प्रधान सचिव, महसूल यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३ मार्च, २०१६ रोजी अभ्यास समिती गठीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीच्या आतापर्यंत किती बैठका झाल्या तसेच सदर विषयावर समितीने अभ्यास पूर्ण केला आहे काय, उक्त प्रकरणी कोणता निर्णय घेण्यात आला आहे, तसेच निर्णय केव्हा होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) उक्त समितीच्या आतापर्यंत २ बैठका झालेल्या आहेत. देवस्थान मालकीच्या जमिनीबाबत अस्तित्वात असलेल्या कायद्याच्या आधारावर राज्यातील देवस्थान समितीच्या जमिनीच्या संदर्भात शासनाची भुमिका ठरविण्याकरिता प्रधान सचिव, महसूल यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या बैठका घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे शुल्क कमी करण्याबाबत

(२५) * ४०९७२ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी हे प्रामुख्याने ग्रामीण भागातील व शेतकरी कुटुंबातील असून स्पर्धा परीक्षांचे शुल्क रुपये ५००/- इतके आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे शुल्क हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या तुलनेने कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे शुल्क कमी करण्याची मागणी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शासनाकडे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता/निवडप्रक्रियांकरिता खालीलप्रमाणे शुल्क आकारण्यात येते.

अ.क्र.	भरतीचा प्रकार	शुल्क (रुपये २४/- सेवा आकारासह)	
		अमागास	मागास
१	स्पर्धा परीक्षा-पूर्व	३७४/-	२७४/-
२	स्पर्धा परीक्षा- मुख्य	५२४/-	३२४/-
३	सरळसेवेची अनुभव आवश्यक असलेली पदे	५२४/-	३२४/-
४	सरळसेवेची अनुभव आवश्यक नसलेली पदे	३७४/-	२७४/-

(२) होय.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षांचे परीक्षा शुल्क व मुलाखतीद्वारे थेट भरतीसाठीच्या अर्जासोबत घ्यावयाच्या आवेदन शुल्कामध्ये आयोगाने दिनांक ०१/०४/२०१४ मध्ये दरवाढ केली असून त्यानंतर त्यामध्ये अद्याप पर्यंत वाढ केलेली नाही.

(३) होय.

तथापि, सन २०१४ मध्ये परीक्षा आयोजन खर्च विचारात घेऊन परीक्षा शुल्कात वाढ केली असल्याने हे शुल्क कमी करण्याची मागणी व्यवहार्य नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील अपहरणाच्या घटनांना प्रतिबंध करण्याबाबत

(२६) * ४१०३४ श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपाडा (मुंबई) येथील बाप्टी रोडवरील ६ वर्षीय मुलाचे २८ वर्षीय तरुणाने दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी अपहरण केले तर वांद्रे पश्चिमेकडील एस.व्ही. रोड परिसरातील जुना स्लाटर हाऊस कंपाऊंड मधील ४ वर्षाच्या मुलाचे अपहरण झाले व अंधेरी येथून ६ वर्षाच्या मुलीचे अपहरण करण्यात आल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार मुंबईतील अपहरणाच्या घटनांना प्रतिबंध करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) दिनांक २१ डिसेंबर २०१७ रोजी नागपाडा येथील ६ वर्षीय मुलाबाबत नागपाडा पोलीस स्टेशन व वांद्रे पश्चिमेकडील ४ वर्षाच्या मुलाच्या संदर्भात वांद्रे पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

तथापि, अंधेरी येथील ६ वर्षाच्या मुलासंदर्भात अंधेरी पोलीस स्टेशन येथे अपहरणाबाबत कोणताही गुन्हा झाल्याची नोंद आढळून येत नाही.

(२) नागपाडा येथील ६ वर्षाच्या हरविलेल्या मुलाबाबत फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून नागपाडा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ५५६/२०१७ भा.दं.वि. कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. नमूद गुन्ह्यात एका आरोपीस अटक केली असून न्यायालयीन कस्टडीत आहे. अपहृत मुलाची सुटका करण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत गुन्हा पोलीस तपासावर आहे.

वांद्रे येथील ४ वर्षाच्या हरविलेल्या मुलाबाबत फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून वांद्रे पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ६४०/२०१७ भा.दं.वि. कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. सदर गुन्ह्यात अपहरण झाले नसल्याचे निष्पन्न झाल्याने सदर गुन्ह्यांचा अंतिम अहवाल "क" वर्गीकरण समरी मंजुरीसाठी मा.न्यायालयात सादर करण्यात आला आहे.

अल्पवयीन मुलांचे अपहरण रोखण्याकरीता शाळा, शैक्षणिक संस्था, कॉलेज यांना प्रत्येक पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी तसेच महिला पोलीस पथकांच्यामार्फतीने भेटी देवून अशा प्रकारचे गुन्हे होवू नयेत म्हणून सावधगिरीच्या सूचना देण्यात येतात. बस थांबे, गर्दीचे ठिकाणी सातत्याने गस्त घालून लहान मुले पालकांशिवाय फिरत नसल्याची खात्री केली जाते. विविध शाळांच्या मुख्याध्यापकांच्या पोलीस मित्र कमिटी, मोहल्ला कमिटी, शांतता कमिटी, महिला दक्षता कमिटी, झोपडपट्टी पंचायत समिती इत्यादीच्या बैठका घेवून लहान मुलांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने घ्यावयाच्या सूचना दिलेल्या आहेत. पोलीस ठाण्यात असलेल्या मोबाईल वायरलेस वाहनाव्दारे वायरलेस पी.ए. सिस्टिमचा वापर करुन लहान मुलांचे अपहरण होवू नये म्हणून जनजागृती करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शेतकऱ्यांनी ऊसाला भाव मिळण्यासाठी आंदोलन केल्याबाबत

(२७) * ४१०७५ श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना यंदाच्या गळीत हंगामात प्रति टन रुपये ३ हजार १०० इतका एक रकमी भाव मिळावा यासाठी पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाडयातील शेतकऱ्यांनी दिनांक १६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंदोलनादरम्यान पोलिसांनी औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथे आंदोलकावर लाठीहल्ला व गोळीबार केला असता त्यात दोन शेतकरी जखमी व दोन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जखमी तसेच मृत शेतकऱ्यांना अद्याप आर्थिक मदत न मिळल्यामुळे त्याच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांच्या ऊसाला भाव देणे व शेतकऱ्यांवर गोळीबार करणाऱ्या पोलिसांवर कारवाई होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदरचे आंदोलन मौजे खानापूर जवळ, गंगामाई साखर कारखाना, घोटण, ता.शेवगांव, जि.अहमदनगर येथे दिनांक १५/११/२०१७ रोजी सकाळी ११.०० ते ०१.०० वा. दरम्यान झालेले आहे. सदर आंदोलनातील हिंसक जमाव पांगवण्यासाठी पोलिसांनी शॉटगनमधून ७ स्प्लिंटर फायर केल्याने त्यात जमावातील पैठण येथील दोन व्यक्ती जखमी झाले असून त्यांच्यावर अहमदनगर येथील मॅक्स केअर या खाजगी दवाखान्यात उपचार करण्यात येऊन त्यांना डिसचार्ज देण्यात आला. परंतू सदर आंदोलनामध्ये कोणत्याही शेतकऱ्याचा मृत्यू झालेला नाही.

(३) सदर आंदोलनातील पैठण येथील जखमी झालेल्या दोन शेतकऱ्यांना तहसिलदार, पैठण, जि.औरंगाबाद यांचेमार्फत प्रत्येकी रुपये १,००,०००/- आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

(४) केंद्र शासनाने दिनांक ०१/०६/२०१७ चे अधिसूचनेनुसार हंगाम २०१७-१८ साठी ९.५०% साखर उताऱ्यासाठी रुपये २,५५०/- प्रमेटन व त्यापुढील प्रत्येक १% साखर उताऱ्यासाठी रुपये २६८/- प्रमेटन याप्रमाणे FRP दर जाहिर केला आहे. केंद्र शासनाने जाहिर केल्यानुसार ऊस पुरवठादारांना किमान रास्त व किफायतशीर (FRP) ऊसदर देणे कारखान्यांना ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ मधील तरतूदीनुसार बंधनकारक आहे.

गाळप ऊसाला किमान आधारभूत किंमतीपेक्षा (FRP) पेक्षाकमी किंवा ऊस नियंत्रण मंडळाने निश्चित केलेल्या दरापेक्षा कमी दर अदा करणाऱ्या कारखान्यावर विनियमन अधिनियम, २०१३ मधील तरतूदीनुसार दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद आहे. थकीत FRP संदर्भात संबंधित कारखान्यांच्या सुनावण्या साखर आयुक्तालयात सुरु आहेत.

सदर घटनेमधील गोळीबाराची दंडाधिकारीय चौकशी करण्यासाठी जिल्हादंडाधिकारी यांनी उपविभागीय दंडाधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांची नियुक्ती केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या शाळांचा दर्जा सुधारण्याबाबत

(२८) * ४१०९१ श्री.जनार्दन चांदूरकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी रुपये ४४ हजार खर्च करीत असून मागील ५ वर्षात महानगरपालिका शाळेतील विद्यार्थी पटसंख्या ९१ हजारांनी कमी झाली आहे असे प्रजा फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेने यासदंर्भात तयार केलेल्या अहवालातून दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पटसंख्या टिकविण्यासाठी महानगरपालिकेने सुरु केलेला सेमी इंग्रजी पॅटर्न देखील अपयशी ठरला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महापालिकेची मुंबई पब्लिक स्कूल ही संकल्पना राबवून शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी व विद्यार्थ्यांची गळती थांबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी पटसंख्या कमी झाल्याबाबतचा अहवाल प्रजा फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेचा अहवाल माहे डिसेंबर, २०१७ मध्ये प्रसिध्द झाला होता, ही वस्तुस्थिती आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेने महानगरपालिकेच्या ६३२ शाळांमध्ये सेमी इंग्रजीचा पॅटर्न सुरु केल्याने विद्यार्थी संख्या स्थिर झाली आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई पब्लिक स्कुल ही संकल्पना राबविल्यामुळे विद्यार्थ्यांचा तसेच शाळांचा दर्जा वाढलेला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी व विद्यार्थ्यांची गळती थांबविण्यासाठी महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

- मोफत पाठयपुस्तके, २७ शालोपयोगी वस्तू, मध्यान्ह भोजन तसेच इ. ८ वी पासून विद्यार्थ्यांना टॅबचे वितरण केले जाते.
- व्हर्च्युअल क्लासरुमच्या माध्यमातून शैक्षणिक तासिकांचे आयोजन करुन विशेष मार्गदर्शन केले जाते.
- ज्ञानरचना वादावर आधारीत शैक्षणिक कामकाज व्हावे यासाठी विविध कार्यशाळांचे, प्रशिक्षणांचे, मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन केले जाते.
- इयत्ता ६ वी ते ८ वी या वर्गांना हस्तकला, चित्रकला व संगीत शिकविण्यासाठी तज्ञ शिक्षक उपलब्ध आहेत.
- शाळा सुधार प्रकल्पांतर्गत ५८ व्दिभाषिक शाळांमध्ये इयत्ता १ ली पासून माध्यमाच्या भाषेबरोबर प्रथम भाषा इंग्रजी शिकविण्यात येते.

- महानगरपालिकेच्या सर्व शिक्षक, मुख्याध्यापक व विभाग निरीक्षक यांना इंग्रजीवर प्रभुत्व येण्यासाठी ब्रिटीश काऊन्सिलमार्फत विशेष प्रशिक्षण देण्यात येत आहे.
- माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन वर्ग शिबिरांचे आयोजन केले जाते.
- गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिस दिले जाते.
- प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना गणित, ऑलिम्पियाड, विज्ञान ऑलिम्पियाड, इंग्रजी ऑलिम्पियाड, प्रज्ञाशोध परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा तसेच अन्य आंतरराष्ट्रीय परीक्षांना बसता यावे यासाठी विद्यार्थ्यांची शैक्षणिक तयारी करुन घेण्यासाठी अभ्यासक्रम व परीक्षांचे नियोजन केले आहे.
- महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये संगणक प्रशिक्षण दिले जाते.
- इयत्ता १ ली ते ५ वी मधील विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांना शारीरिक शिक्षणाचे सेवांतर्गत प्रात्यक्षिकांसह विशेष प्रशिक्षण दिले जाते.
- विद्यार्थ्यांना विज्ञान क्षेत्रात रुची निर्माण व्हावी यासाठी मिनी सायन्स लॅबची निर्मिती करण्यात आली आहे.
- शिक्षण क्षेत्रामध्ये नव्याने होत असलेल्या सकारात्मक आधुनिक बदलांची जाणीव जागृती करण्यासाठी प्रशिक्षकांसाठी विविध प्रशिक्षणांचे आयोजन केले जाते.
- शाळांमध्ये चालणाऱ्या शैक्षणिक कामकाजाची माहिती करुन घेण्यासाठी व आवश्यकतेनुसार योग्य व समर्पक मार्गदर्शन करण्यासाठी महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकाऱ्यांपासून ते विभाग निरीक्षक (शाळा) पर्यंत सर्व अधिकारी वर्ग शाळा भेटी देत असतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर महापालिकेच्या शाळांमधील शिक्षकांना थकीत वेतन देण्याबाबत

(२९) * ४११६२ डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर महापालिकेच्या शाळांमधील ४६ शिक्षकांना मागील ४ महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या शिक्षकांनी कुटुंबियांसह महापालिकेसमोर दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजीपासून उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त शिक्षकांचे थकीत वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) अहमदनगर महानगरपालिकेच्या शाळांमधील शिक्षकांचे मागील चार महिन्यापासूनचे वेतन मिळाले नसल्याच्या कारणास्तव दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी उपोषण केले होते, ही वस्तुस्थिती आहे.

(३)

- महानगरपालिकेच्या अखत्यारित असलेल्या शाळांमधील शिक्षकांच्या वेतनासाठी शासनाने ५० टक्के रक्कम व महानगरपालिकेने ५० टक्के रक्कम देण्याचे शासनाचे धोरण आहे.
- त्यानुसार, फेब्रुवारी, २०१८ पर्यंतची शासन हिश्श्याची रक्कम महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे.
- सदर प्राप्त रकमेतून महानगरपालिकेच्या सदर शिक्षकांचे नोव्हेंबर, २०१७ पर्यंतचे वेतन अदा करण्यात आले आहे.

- संबंधित शिक्षकांचे तीन महिन्याचे थकीत वेतन हे एप्रिल, २०१८ पर्यंत अदा करण्याबाबत, तसेच, यापुढे शिक्षकांचे वेतन नियमितपणे अदा होईल याबाबत दक्षता घेण्याबाबत आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांना सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जव्हार (जि.पालघर) नगरपरिषदेतील शिवाजी उद्यानाची दुरवस्था झाल्याबाबत

(३०) * ४१२०७ श्री.आनंद ठाकूर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) नगरपरिषदेतील शिवाजी उद्यानाची दुरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दुरवस्थेत असलेल्या उद्यानाची दुरुस्ती करुन सदरहू उद्यानाच्या देखभाल व दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उद्यानाचे सुशोभिकरण करुन उद्यानाच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) अशा प्रकारची कोणतीही तक्रार नगरपरिषद प्रशासनास प्राप्त झालेली नाही. तथापि, या विषयाची बातमी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली, असे नगरपरिषदेने कळविले आहे.

(२) व (३) जव्हार नगरपरिषदेच्या शिवाजी उद्यानातील काही खेळणी नादुरुस्त आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

- जव्हार नगरपरिषदेमार्फत उद्यानाची नियमितपणे देखभाल करण्यात येत असून नुकतेच संरक्षक भिंतीचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
- नगरपरिषदेमार्फत महाराष्ट्र नगरोत्थान (जिल्हास्तर) योजनेंतर्गत शिवाजी उद्यानाच्या विस्तारीकरण व नुतनीकरणाचा रुपये १.६३ कोटीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पालघर यांना सादर करण्यात आला असून, यामध्ये प्रामुख्याने उद्यानातील खेळणी दुरुस्ती इत्यादी बाबींचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत ऑनलाईन कॅशलेस व्यवहारांद्वारे फसवणुक झाल्याबाबत

(३१) * ३७७९९ श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत माहे जानेवारी ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत ७४७ जणांची ऑनलाईनद्वारे फसवणुक झाली असून यातील ९४ टक्के गुन्ह्यांची उकल करण्यात पोलीस यंत्रणा अपयशी ठरली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन कॅशलेस व्यवहारांवर भर देत असून अशा प्रकारच्या वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविणे अथवा घडणाऱ्या गुन्ह्यांचा शोध लावण्यासाठी लागणारे आवश्यक तंत्रज्ञान पोलीस कर्मचाऱ्यांना देण्यात शासन कमी पडल्यानेच या गुन्ह्यांची उकल होण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीस कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) ठाणे पोलीस आयुक्तालयामध्ये माहे जानेवारी, २०१७ ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीमध्ये एकूण ऑनलाईन फसवणुकीचे २४० गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी १५ गुन्हे उघडकीस आले आहेत. अशा प्रकारे गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण ६.२५% आहे.

(२) सायबर गुन्ह्यांचा तपास करताना असे निदर्शनास आले आहे की बहुतांश गुन्हेगार व सायबर गुन्ह्यांशी संबंधित सर्वर बाहेरच्या देशात असल्याने सर्वर कंपन्यांकडून गुन्हेगार विषयक माहिती घेत असताना संबंधित देशातील कायद्याप्रमाणे नियमांची पुर्तता करुन माहिती मिळेपर्यंत थांबावे लागते.

राज्यातील सर्व जिल्हे व पोलीस आयुक्तालयामध्ये मिळून एकूण ४७ सायबर लॅब दिनांक १५/०८/२०१६ पासून सुरु करण्यात आल्या आहेत. सदर सायबर लॅबपैकी ४३ सायबर लॅब ना 'सायबर पोलीस ठाणे' असे घोषित करण्यात आले आहे. या सायबर लॅब/पोलीस ठाणे यांना तपासाकरिता आधुनिक यंत्रसामुग्री (सोफ्टवेअर व हार्डवेअर) पुरविण्यात येत आहे.

(३) ऑनलाईन फसवणुकीच्या गुन्ह्यांचा तपास करता यावा म्हणून ठाणे पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांना या गुन्ह्यातील तपास कसा करावा त्याबाबतचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. असे प्रशिक्षण ही एक सातत्याने करावयाची प्रक्रिया असून अशी प्रशिक्षणे सतत चालु आहेत.

मोबाईल फॉरेन्सीक व सायबर गुन्ह्यांचा तपास या विषयावर जानेवारी ते डिसेंबर, २०१७ या कालावधीत ठाणे पोलीस आयुक्तालयात एकूण २५ पोलीस अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच राज्यस्तरावर १३८ पोलीस अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे प्रभाग अधिकारी नागरिकांना शिवीगाळ करीत असल्याबाबत

(३२) * ४०५८४ श्री.परिणय फुके : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिकेचे प्रभाग अधिकारी श्री.अविनाश जाधव हे नागरिकांना शिवीगाळ करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचेकडे तक्रार करुनही उक्त प्रभाग अधिकारी यांचेवर कोणतीही कारवाई न करता त्यांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) श्री.अविनाश जाधव, प्रभाग अधिकारी यांनी सार्वजनिक ठिकाणी शिवीगाळ केल्याची व्हिडीओ क्लीप सोशियल मिडीयावर व्हायरल झाली, तसेच याबाबत तक्रार प्राप्त झाली, ही वस्तुस्थिती आहे.

(२) श्री.अविनाश जाधव, प्रभाग अधिकारी यांनी सार्वजनिक ठिकाणी शिवीगाळ केल्याच्या अनुषंगाने त्यांना ठपका ठेवण्याची तसेच रुपये १०००/- दंडाची शिक्षा देण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे अशा प्रकरणाची पुनरावृत्ती होणार नाही, अशी त्यांना महानगरपालिकास्तरावर समज देण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महापालिकेच्या "सी" विभाग कार्यालयाच्या हद्दीतील परिसरामध्ये आयझॉल हे जंतुनाशक टाकले जात असल्याबाबत

(३३) * ३८६१७ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या "सी" विभाग कार्यालयाच्या हद्दीतील परिसरामध्ये आयझॉल हे जंतुनाशक मोठ्या प्रमाणात टाकले जात असल्यामुळे रस्ते लालभडक दिसत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यावरील वाहनांच्या रहदारीमुळे हे जंतुनाशक दुकाने व घरात पसरू लागल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त स्वच्छता मोहिम स्वच्छ भारत अभियानांतर्गत करण्यात आलेल्या स्वच्छतेची पाहणी करण्यासाठी येणाऱ्या केंद्रीय अधिकारी यांच्यासाठी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रकारे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण करणारी स्वच्छता मोहिम त्वरित थांबविण्यासाठी शासनाने महापालिकेला निर्देश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) बृहन्मुंबईच्या महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत परिसरात दुर्गंधी व रोगराई पसरु नये याकरिता आयझॉल या पांढऱ्या/लाल रंगाच्या जंतुनाशक पावडरचा वापर नियमितपणे करण्यात येतो.

परंतु त्यामुळे रस्ते लालभडक दिसत नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, “रस्त्यांवर स्वच्छतेची लाली” अशा आशयाची बातमी दिनांक १८/०१/२०१८ रोजीच्या लोकसत्ता वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती, ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर जंतुनाशक पावडरच्या जंतुशमन क्षमतेच्या योग्य त्या तपासण्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेत करण्यात आल्या असून, सदर तपासणीत जंतुनाशक पावडरची जंतुशमन क्षमता नियमानुसार आहे.

तसेच, महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या अहवालानुसार सदर परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात नसल्याचे दिसून आले आहे.

(३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विभागामध्ये नियमितपणे करण्यात येत असलेल्या स्वच्छतेच्या कामाकरिता आयझॉल या जंतुनाशक पावडरची फवारणी करण्यात येते.

त्यामुळे स्वच्छता मोहिमेंतर्गत स्वच्छतेची पाहणी करण्यासाठी येणाऱ्या केंद्रीय अधिकारी यांच्यासाठी सदर जंतुनाशकाची फवारणी करण्यात आली, ही बाब खरी नाही.

सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील ड्रग्ज पार्टी प्रकरणाबाबत

(३४) * ४०३६५ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील जुना बाजार परिसरात उघड झालेल्या ड्रग्ज पार्टी प्रकरणात कोणत्याच आरोपींना अटक करण्यात आली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ड्रग्ज पार्टीकरिता लहान मुलांना चरस, गांजा, दारु तसेच इतर तत्सम पदार्थ पुरविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणात अद्याप कोणासही अटक न झाल्याने स्थानिक पोलीस हे आरोपींना पाठीशी घालत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषी पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच ड्रग्ज व इतर पदार्थ पुरविणाऱ्या आरोपींना अटक करून त्यांचेवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

दिनांक १६/०१/२०१८ रोजी स्थानिक नगरसेविका अनारोजीन लोबो यांनी दुरध्वनीवर सदर ठिकाणी दारु अथवा ड्रग्सचे सेवन होत असल्याबाबत केलेल्या तक्रारीवरुन शहरात शोध घेतला असता शहरामध्ये कोणत्याही ठिकाणी कोणीही माणसे ड्रग्स पार्टी करीत असताना अथवा बाळगलेल्या स्थितीत आढळून आले नाहीत.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) तक्रारदार श्रीम. लोबो यांनी नमूद केलेल्या संशयितांना चौकशी कामी बोलाविले असता श्रीम. लोबो यांनी सदरील व्यक्ती दिनांक १६/०१/२०१८ रोजी दारु पिणाऱ्यांपैकी नाहीत असे सांगितले.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

आदिवासींची बनावट जात प्रमाणपत्रे सादर करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(३५) * ४०९९४ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी समाजातील असल्याचे बनावट जात प्रमाणपत्रे घेऊन त्याच्या आधारे शासकीय नोकऱ्या मिळविणाऱ्या ११ हजार ७७० कर्मचारी व अधिकारी यांचेवर कारवाई करुन त्यांना कायमस्वरुपी बडतर्फ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अ ते ड वर्गानुसार बडतर्फ करण्यात येणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची विगतवारी काय आहे तसेच त्यांना बडतर्फ करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी प्रत्यक्षात केव्हापासून करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) खरे नाही,

(२) व (३) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ६ जुलै, २०१७ च्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबतच्या कार्यवाहीची रुपरेषा ठरविण्यात येत आहे. या कारणाने आतापर्यंत जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्याचे कोणतेही आदेश सामान्य प्रशासन विभागाने अद्याप निर्गमित केलेले नसल्याने अ ते ड वर्गानुसार बडतर्फ करण्यात येणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची विगतवारी उपलब्ध नाही.

मौजे वाघाळा (ता.परळी, जि.बीड) या गावातील श्री.अनंत दत्तोपंत उबाळे यांच्या घरावर दरोडा पडल्याबाबत

(३६) * ४०७९४ श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाघाळा (ता.परळी, जि.बीड) या गावात दिनांक १५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास श्री.अनंत दत्तोपंत उबाळे यांच्या घरावर दरोडा पडला असून त्यात सोने-चांदी व रक्कम अशी सुमारे १० लाख रुपयांची चोरी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गुन्हयाचा तपास करण्यात परळी ग्रामीण पोलीस प्रशासनाला अपयश आले असून चोरट्यांना अदयाप अटक करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार गुन्हयातील आरोपींचा तपास लावून त्यांना अटक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) अंशत: खरे आहे.

दिनांक १५/०५/२०१७ रोजी कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या घरात प्रवेश करून सोन्या चांदीचे दागिने व नगदी पैसे असा एकूण २,१६,०५० रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेल्याप्रकरणी परळी ग्रामीण पो.स्टे. येथे गु.र.नं. १३०/२०१७ भादंविक. ४५७,३८० नुसार घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) सदर गुन्हयाच्या तपासासाठी फिंगर प्रिंट तज्ञ व डॉग स्कॉड यांना पाचारण करून, सी.सी.टी.व्ही. फुटेज हस्तगत करून तपासाचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच गुप्त बातमीदार नेमून संशयित आरोपींच्या घरझडत्या घेवून, पेट्रोलिंग वाढवून गुन्हा उघडकीस आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला जात आहे. सदरचा गुन्हा कायम तपासावर ठेवून 'अ' वर्गात समरी मंजूर केली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये सेवा आणि विविध उपचारासाठी प्रस्तावित केलेली शुल्कवाढ कमी करणेबाबत

(३७) * ३९७५८ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये सेवा आणि विविध उपचारासाठी ५० टक्के शुल्कवाढ करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मांडला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शुल्क वाढ ५० टक्के न करता २० टक्के करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधीमार्फत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार प्रस्तावित शुल्कवाढ नागरिकांना परवडणारी नसल्याने ती कमी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये सेवा आणि विविध उपचारासाठी ५० टक्के शुल्कवाढ करण्याचा प्रस्ताव महानगरपालिका प्रशासनामार्फत सादर करण्यात आला होता. तथापि, त्यास मान्यता प्राप्त झाली नाही.

(२) सदर शुल्कवाढ २० टक्के करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी केली होती.
(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये आकारण्यात येणाऱ्या विद्यमान शुल्कात २०% व मुंबईबाहेरील रुग्णांकरीता ३०% वाढीचा व ज्येष्ठ नागरिकांकरीता विनाशुल्क सेवा उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या स्थायी समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामधील दलितवस्तीमधील कामे निकृष्ट दर्जाची केल्याबाबत

(३८) * ३८४९९ ॲड.अनिल परब : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामधील दलितवस्तीमध्ये विविध कामांसाठी राज्य शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आलेला कोट्यवधीचा निधी महानगरपालिका क्षेत्रामधील ज्या ठिकाणी दलितवस्ती आहे अशा ठिकाणीच वापरणे बंधनकारक असताना महानगरपालिकेने आपल्या अखत्यारितील या कामांसाठी नियुक्त केलेल्या काही सक्षम अधिकारी वर्गाने या निधीचे वाटप करण्यात असमतोल राखला असून अत्यंत निकृष्ट दर्जाची कामे केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१५-२०१७ या कालावधीत दलितवस्तीमधील कामांची दक्षता व गुणनियंत्रक विभागामार्फत चौकशी करणेबाबत स्थानिक नागरिक श्री.मनोज कुलकर्णी यांनी दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास प्रभारी शहर अभियंता, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडे लेखी स्वरुपात तकार करुनही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त कामासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

नगरविकास विभागाच्या दिनांक ०५/०३/२००२ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वानुसार नागरी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत कामे करण्यात आली असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळवले आहे.

(२), (३) व (४) श्री.मनोज कुलकर्णी यांची तक्रार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे प्राप्त झाली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या दक्षता व गुणनियंत्रण विभागामार्फत सदर प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

सदर चौकशी पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल दोन आठवड्यात सादर करण्याच्या सूचना कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

राज्यातील कंत्राटी कामगारांसाठी किमान वेतन सल्लागार मंडळ स्थापन करणेबाबत

(३९) * ४००९९ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९७० च्या कायद्यानुसार कंत्राटी कामगारांच्या नियुक्ती व वेतनासंबंधी व्यवस्थापनाबरोबर अथवा मालकांबरोबर झालेले विवाद मिटविण्यासाठी तसेच कंत्राटी कामगार आणि व्यवस्थापन यांच्यात समेट घडवून आणण्यासाठी किमान वेतन सल्लागार मंडळ स्थापन करणेबाबत दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.कामगार मंत्री व कामगार आयुक्त यांच्याकडे लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार किमान वेतन सल्लागार मंडळ स्थापन करून राज्यातील कंत्राटी कामगारांना किमान वेतन व अन्य सुविधा मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संभाजी पाटील-निलंगेकर : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) किमान वेतन सल्लागार मंडळ स्थापन करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. मंडळ गठित झाल्यानंतर किमान वेतन निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

येवला (जि.नाशिक) येथील मुक्तीभूमीला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळण्याबाबत

(४०) * ३९३६१ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) येथील मुक्तीभूमीला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळण्यासाठी दिनांक ७ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मुक्तीभूमीचा 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रात समावेश करण्याची बाब नगरविकास विभागाशी संबंधित असल्याने त्या विभागास योग्य ती कार्यवाही करण्याबाबत पर्यटन विभागाकडून माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) हे खरे आहे.

(३) जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडून "ब" वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा देण्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव मागविण्यात आला आहे. याबाबत शासनस्तरावरुन देखील पाठपुरावा करण्यात येत आहे. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील जाहिरातीसाठी शुल्क न भरणाऱ्या मॉल व मल्टिप्लेक्सधारकांवर कारवाई करण्याबाबत

(४१) * ३८७९३ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील २२ मॉल व मल्टिप्लेक्सधारकांना विनापरवानगी जाहिरातीसाठी शुल्क भरण्याबाबत महानगरपालिकेने नोटीसा पाठविल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात आढळून आले व तद्नुसार विनापरवानगी जाहिराती करुन शुल्क न भरणाऱ्या किती मॉल व मल्टिप्लेक्सधारकांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) पुणे शहरातील एकूण मॉलपैकी ज्या मॉलधारकांनी मॉलमध्ये व मॉलच्या बाहेर लावलेल्या जाहिरातीचे अद्याप शुल्क भरणा केलेले नाही, अशा मॉलचा पुणे महानगरपालिकेने आढावा घेतला असून सर्वेक्षणानंतर जाहिरात शुल्क न भरलेले एकूण २१ मॉल निदर्शनास आलेले आहेत.

सदरच्या २१ मॉल धारकांकडून जाहिरात शुल्क व तडजोड शुल्क आकारणी करून त्याची वसूली करण्याची कार्यवाही पुणे महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

या मॉलधारकांना दिनांक ०३/१०/२०१७ ते दिनांक ०५/०१/२०१८ या कालावधीत प्रथम नोटीस देऊन तात्काळ शुल्क भरण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तद्नंतरही अशा मॉलधारकांनी शुल्क भरले नाही तर संबंधित फलकावर निष्कासनाची तात्काळ कारवाई करण्याचे प्रायोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई येथील विकासक व कंपन्यांनी महानगरपालिकेचा मालमत्ता कर थकविल्याबाबत

(४२) * ३९२६४ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील निर्मल लाईफ स्टाईल, फिनिक्स मिल यांसारखे मोठे मॉल आणि लोखंडवाला, इन्फ्रा, लार्सन टुब्रो अशा सुमारे १०० विकासक आणि कंपन्यांनी महानगरपालिकेचा कोट्यवधी रुपयांचा मालमत्ता कर थकविल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भांडूप (प.) येथील मे.एचडीआयएल या विकासकाकडून रुपये १,५५,९६,३८,९१६/- एवढा मालमत्ता कर वसूल करण्यासाठी महानगरपालिकेने 'एस' विभागातील उक्त विकासकाच्या १४ मालमत्तांची जलजोडणी खंडीत करण्याची तसेच 'एल' व 'एस' विभागातील एचडीआयएलच्या प्रत्येकी सहा मालमत्तांची जलजोडणी खंडीत करण्याची कार्यवाही केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एचडीआयएल या विकासकाच्या 'एस' विभागातील उपरोक्त सहा मालमत्तांच्या कामांना दिलेली परवानगी रद्द करुन महानगरपालिकेचा थकीत मालमत्ता कर वसुल होईपर्यंत त्यांच्या नवीन विकास कामांना परवानगी देण्यात येऊ नये अशी मागणी पत्राद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधींनी

मा.मुख्यमंत्री व आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांच्याकडे दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास तसेच सहायक आयुक्त, एस विभाग, भांडूप (प) यांच्याकडे दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार मालमत्ता कर थकविणाऱ्या विकासक व कंपन्याविरुध्द कार्यवाही करून थकित मालमत्ता कर वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) मुंबईतील निर्मल लाईफ स्टाईल यांच्या एकूण ९ मालमत्तांचा रुपये १९.२२ कोटी, फिनिक्स मिल यांच्या एकूण ४ मालमत्तांचा रुपये २.१५ कोटी व लोखंडवाला कटारिया यांच्या एका मालमत्तेचा रुपये ७.२० कोटी इतका मालमत्ता कर थकीत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, लार्सन ॲण्ड टुब्रो या कंपनीचा मालमत्ता कर थकीत नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) भांडुप येथील "एस" विभागातील मे.एच.डी.आय.एल. यांच्या १९ मालमत्तांच्या दिनांक ३१/०३/२०१८ पर्यंत थकीत असलेल्या मालमत्ता कराची थकबाकी रुपये ४२.२० कोटी इतकी असून, सदर मालमत्तांच्या जलजोडण्या बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खंडीत करण्यात आल्या आहेत.

कुर्ला येथील "एल" विभागातील ६ मालमत्तांचा थकीत मालमत्ता कर रुपये ३३.०१ लक्ष इतका असून, एका मालमत्तेस बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत जलजोडणी देण्यात आलेली नाही.

उर्वरित ५ मालमत्तांना मे.एच.डी.आय.एल. यांच्या नावे जलजोडण्या देण्यात आलेल्या नसून, त्या मानवतावादी दृष्टीकोनातून तेथील रहिवाशांच्या नावे देण्यात आलेल्या आहेत.

सदर ५ मालमत्तांपैकी ४ मालमत्तांची जलदेयके थकीत नसून, एका मालमत्तेच्या रुपये १०.९९ लाख इतक्या थकीत जलदेयकाअभावी त्यांची जलजोडणी दिनांक ०४/१२/२०१७ रोजी खंडीत करण्यात आलेली आहे.

(३) अशा स्वरुपाचे स्थानिक लोकप्रतिनिधींचे दिनांक ११/०८/२०१७ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) मालमत्ता कर थकविणाऱ्या विकासक व कंपन्यांविरुध्द बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली/येत आहे :-

निर्मल लाईफ स्टाईल

- एकूण ९ मालमत्तांपैकी १ मालमत्तेचे प्रवेशद्वार मोहोरबंद करण्यात आले.
- ४ मालमत्तांची जलजोडणी खंडीत करण्यात आली असून, प्रवेशद्वार मोहोरबंद करण्याची कार्यवाही सुरु आहे.
- तसेच, उर्वरित ४ मालमत्तांचे प्रवेशद्वार मोहोरबंद करण्याची कार्यवाही सुरु आहे.

फिनिक्स मिल

- मा.उच्च न्यायालयातील रिट पिटीशन (एल) ९३६/२०१५ मधील दिनांक ०१/०४/२०१५ रोजीच्या आदेशानुसार, ४ मालमत्तांच्या मालमत्ता कराच्या दिनांक ३०/०९/२०१७ पर्यंतच्या देय रकमेच्या ५०% अधिदान करण्यात आले आहे.
- मा.न्यायालयाच्या आदेशानुसार, सदर मालमत्तांच्या मालमत्ता कराच्या दिनांक ०१/१०/२०१७ ते ३१/०३/२०१८ या कालावधीच्या देय रकमेच्या ५०% अधिदान करण्यासाठी दिनांक १५/१२/२०१७ रोजी मागणीपत्र पाठविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

टिटवाळा (जि.ठाणे) येथील तरुणाने पोलिसांच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याबाबत

(४३) * ३९२९१ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टिटवाळा (जि.ठाणे) येथील साईप्रसाद सोसायटीत राहणाऱ्या तरुणाने पोलिसांच्या जाचाला कंटाळून दिनांक २३ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास घरात आत्महत्या केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार तरुणाच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या पोलिसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय. परंतू सदर आत्महत्या ही पोलिसांच्या जाचाला कंटाळून केली आहे. याबाबतचा कुठलाही पुरावा प्राप्त झाला नसल्याने याबाबत अधिक तपास सुरु आहे.
(२) सदर घटनेबाबत कल्याण ता. पोलीस स्टेशन येथे दिनांक २३/०८/२०१७ रोजी अकस्मिक मृत्यू रजि.क्र.९१/२०१७ सह.आर.पी.सी. १७४ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. सदर चौकशी सुरु असताना मयताच्या आईने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र. ४७८४/२०१७ दाखल केले असता, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदर प्रकरणी गुन्ह्याचा तपास मा.अपर पोलीस अधिक्षक यांचे मार्गदशनाखाली स्थानिक गुन्हे शाखा यांनी करण्याबाबत आदेशित केल्याने, सदर प्रकरणी कल्याण ता. पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २०/२०१८ भा.दं.वि.सं कलम ३०६, ३४ व २०१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक शहर व जिल्ह्यातील मंदिरांच्या साहित्यांच्या चोरीत वाढ झाल्याबाबत

(४४) * ३९४७४ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७५५१ ला दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहर व जिल्ह्यात विविध ठिकाणी माहे डिसेंबर, २०१६ ते माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान चोरट्यांनी विविध मंदिरातून साहित्य, दागिने व दान पेटीतील रकमा चोरून नेल्याप्रकरणी चालू असलेला उर्वरित गुन्हयांचा तपास पूर्ण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात मंदिराच्या ठिकाणी चोरीच्या घटनात वाढ होऊन कावनई (ता.इगतपुरी) येथे कपिलधारा तीर्थक्षेत्रावर दोन मंदिरात दिनांक २३ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास, उगांव (ता.निफाड) तसेच मालेगांव येथे खड्डाजीन भागातील दोन मंदिराचे कळस चोरून नेल्याची घटना दिनांक ५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार उर्वरित गुन्ह्यांचा तपास करण्याबाबत व मंदिरांच्या सुरक्षिततेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) माहे डिसेंबर, २०१६ ते माहे जानेवारी, २०१७ मध्ये पोलीस आयुक्तालय, नाशिक शहर हद्दीत ६ गुन्हे घडले आहेत, त्यापैकी ४ गुन्हे न्यायप्रविष्ठ असून १ गुन्हा तपासावर आहे व १ गुन्ह्यात मा.न्यायालयाने आरोपींना शिक्षा सुनावली आहे.

तसेच, नाशिक ग्रामीण हद्दीत उक्त कालावधीत ३ गुन्हे घडले असून, २ गुन्ह्यात गुन्हा कायम तपासावर ठेवून, मा.न्यायालयात गुन्ह्याची 'अ' फायनल समरी पाठविण्यात आली आहे व १ गुन्हा तपासावर आहे.

(२) व (३) कपिलधारा तीर्थक्षेत्र मंदिरात चोरी प्रकरणी पोलीस स्टेशन, घोटी येथे गु.र.नं. १५०/२०१७ भा.दं.वि.क. ४५७, ३८० प्रमाणे दिनांक २३/०८/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्ह्याची 'अ' फायनल समरी मा.न्यायालयात पाठविण्यात आली आहे.

तसेच, मालेगांव येथे खड्डाजीन भागात मंदिरावरील कळस चोरीच्या अनुषंगाने मालेगांव शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ६१/२०१७ भा.दं.वि.क. ३७९ प्रमाणे दिनांक ०४/१०/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्ह्याची 'अ' फायनल समरी मा.न्यायालयात पाठविण्यात आली आहे.

तसेच, उगाव (ता.निफाड) येथे चोरी झालेली नसून, त्याबाबत पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल नाही.

मंदिराच्या सुरक्षेसंबंधात मंदिर ट्रस्टी यांना वेळोवेळो भेटी देवून लेखी व तोंडी सूचना दिलेल्या असून, मंदिरात सुरक्षा रक्षक नेमणे, मंदिरात व परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावणे, मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवणेबाबत सूचना देणे, मंदिर सुरक्षेसाठी पोलीस बंदोबस्त नेमणे, शिवाय गुड मॉर्निंग स्क्वॉड, बीट मार्शल यांचेकडून पेट्रोलींग दरम्यान मंदिर चेक करणे इत्यादी उपाय केले जातात व चोरीचे गुन्हे घडणार नाहीत याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

(४) विलंब झालेला नाही.

शहापूर (जि.ठाणे) नगरपंचायतीला निधी उपलब्ध करून देण्याबाबत

(४५) * ४०५६२ श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) नगरपंचायतीची दिनांक ११ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास स्थापना झाली असून आजतागायत येथील नागरिकांना मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपंचायतीचे स्वतःचे उत्पन्न व क्षेत्र मर्यादित असल्याने नगरपंचायतीच्या विकासाच्यादृष्टीने रस्ते, पाणीपुरवठा व आरोग्य सेवा या मुलभूत सोयी पुरवताना अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नगरपंचायतीकडे स्वतःची कोणत्याही प्रकारची जागा नसल्यामुळे घनकचरा व्यवस्थापनकरिता प्रकल्प उभारणीस देखील अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नगरपंचायतीस आवश्यक असलेला कर्मचारी वर्ग, स्वतःची प्रशासकिय इमारत, शहरात पाणीपुरवठा योजना सुरु करणे तसेच अग्निशमन सेवा केंद्र उभारणेकरिता शासनाने निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२)

- शहापूर जि.ठाणे नगरपंचायतीची दिनांक ११/०३/२०१५ रोजी स्थापना झाली आहे.
- नव्याने स्थापन झालेल्या नगरपंचायतीना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याचे सुधारित धोरण शासन निर्णय दिनांक १२/०४/२०१६ अन्वये विहित करण्यात आले आहे.
- शहापूर नगरपंचायतीस २०१५-१६ ते २०१७-१८ या कालावधीत रस्ता अनुदान रुपये ५.६० कोटी, नवीन नगरपंचायत योजनेंतर्गत रुपये ५० लक्ष व १४ व्या वित्त आयोगातून रुपये ३.०५ कोटी इतके अनुदान नागरी सुविधांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे.
- शहापूर नगरपंचायतीचे उत्पन्न व क्षेत्र मर्यादित असले तरी नागरीकांना मुलभुत सोयी-सुविधा पुरविण्यात येत आहे.

(३) घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाकरीता जागा उपलब्ध करून देण्याबाबत तहसिलदार, शहापूर यांच्याशी नगरपंचायतीकडून पत्रव्यवहार करण्यात आला असून, जागेच्या उपलब्धतेनंतर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४)

- नगरपंचायतीकरीता अधिकारी/कर्मचारी यांचा आकृतिबंध मंजूर आहे.
- ग्रामपंचायतीत कार्यरत कर्मचाऱ्यांचे नगरपंचायतीच्या मंजूर आकृतिबंधाच्या मर्यादेत शासनमान्यतेने समावेशन करण्याची प्रक्रिया सुरू आहे.
- नगरपंचायतीस स्वत:ची जागा नसल्याने सद्य:स्थितीत कार्यालय समाज मंदीराच्या जागेत सुरू आहे.
- नगरपंचायतीच्या प्रशासकीय इमारतीसाठी जागा व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत उचित कार्यवाही सुरु आहे.
- शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी नवीन पाणीपुरवठा योजना नगरपंचायतस्तरावर प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत नियमबाहय पध्दतीने टीडीआरचे वाटप झाल्याबाबत

(४६) * ३९७५९ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी माहे जानेवारी ते डिसेंबर, २०१७ या कालावधीत सुमारे ४१ लाख २७ हजार चौरस फूटांच्या हस्तांतरणीय विकास हक्काचे (टीडीआर) नियमबाहय पध्दतीने वाटप केल्याचे व सदर टीडीआरची ९५ टक्के प्रकरणे "क" विभागातील असून त्याची किंमत सध्याच्या बाजारभावानुसार सुमारे ५३०० कोटी रुपयांहून अधिक आहे या बाबी शासनाच्या निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टीडीआरचे नियमबाहय वाटप केल्याप्रकरणी आयुक्तांच्या स्वीय सहाय्यकांना एका विकासकाकडून १२ लाख रुपयांची लाच स्वीकारताना अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत नियमबाहय पध्दतीने टीडीआर वाटप झालेले नाही. माहे जानेवारी ते डिसेंबर, २०१७ या कालावधीत एकूण २३३ प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे. वार्षिक बाजार मुल्यदर तक्त्यातील दरानुसार साधारणपणे ५२८ कोटी मुल्याचे ५७.२७ हे. क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले आहे.

(२) व (३) तत्कालीन आयुक्तांच्या स्वीय सहायकांना एका विकासकाकडून लाच स्विकारतांना अटक झाली होती, ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्याचा टीडीआर प्रकरणाशी संबध नाही. संबंधिताविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक

अधिनियम १९८८ चे तरतूदी अन्वये गुन्हा दाखल झालेला असून महानगरपालिकेने न्यायालयात दावा दाखल करण्यासाठी भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागास (ACB) परवानगी दिलेली आहे. तसेच महानगरपालिकास्तरावर संबधिताविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ नुसार खातेनिहाय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील अतिरिक्त मुख्य अभियंता यांचेवर कारवाई करण्याबाबत

(४७) * ४००८३ श्री.जयंत पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील अतिरिक्त मुख्य अभियंता श्री.आनंद कुमार पहल यांनी फसवणूक करत दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास एन.ए.कन्ट्रक्शन या कंत्राटदारास कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेत पर्जन्य वाहिनीचे काम केल्याचे खोटे प्रमाणपत्र दिले व तपासातही श्री.पहल दोषी आढळल्याने त्यांना दिनांक १६ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निलंबित करून त्यांच्यावर एफ.आय.आर. दाखल करण्याऐवजी शिस्तभंगाची कारवाई करत त्यांना पाठीशी घालण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.पहल दोषी असूनही एम.एम.आर.डी.ए. अंतर्गत आता कोट्यवधी रुपयांच्या १४ कामांची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.पहल यांचेवर एफ.आय.आर. दाखल करण्याची मागणी श्री.अनिल गलगली, माहिती अधिकार कार्यकर्ते यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधितावर एफ.आय.आर. दाखल करण्याच्या मागणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) श्री.पहल, अति.मुख्य अभियंता यांनी मे.एन.ए.कन्स्ट्रक्शन यांना काम केल्याचे प्रमाणपत्र देण्याच्या केलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने प्राधिकरणामार्फत करण्यात आलेल्या विभागीय चौकशीत ते दोषी आढळण्याने त्यांना प्राधिकरणामार्फत अधिक्षक अभियंता या पदावर पदावनत केले असून, त्यांना उपलब्ध कामांपैकी कमी प्राधान्याची कामे देण्यात आलेली आहेत.

(३) होय खरे आहे.

(४) व (५) प्राधिकरणाने विभागीय चौकशी केलेली आहे व त्यात ते दोषी आढळल्याने त्यांना पदावनत करण्यात आलेले आहे.

दिवा (जि.ठाणे) येथील कचराभूमीला पर्यायी जागा देण्याबाबत

(४८) * ४०६१० ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवा (जि.ठाणे) येथील कचराभूमीमध्ये ठाणे, कळवा, मुंब्रा तसेच दिवा येथील आसपासच्या परिसरातील कचरा टाकण्यात येत असून त्याठिकाणी सतत आग लागून संपूर्ण परिसरात धुर पसरत असल्याने परिसरातील नागरिकांना श्वसनाचा त्रास होणे, लहान मुलांना सर्दी, दमा व श्वसनाचे विकार होत असल्याने या ठिकाणी कचरा टाकण्यात येऊ नये या मागणीसाठी दिवा व परिसरातील नागरिकांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलने केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आंदोलन करण्याचा इशारा लेखी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री तसेच आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे महापालिकेने उक्त कचराभूमीला पर्यायी जागा म्हणून शीळ पट्टयात बंद पडलेल्या दगडखाणींची जागा निश्चित केली असून पर्यावरण विभागाच्या काही मंजूऱ्या अभावी ही जागा महापालिकेच्या ताब्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिवा येथील उक्त कचराभूमीला पर्यायी जागा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) दिवा येथील क्षेपणभूमीमुळे परिसरातील नागरिकांना श्वसनाचा त्रास होणे, लहान मुलांना सर्दी, दमा व श्वसनाचे विकार होत असल्याने याठिकाणी कचरा टाकण्यात येऊ नये अशा तक्रारी नागरिकांनी केलेल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.
(२) ठाणे महानगरपालिकेस उक्त निवेदन प्राप्त झाले, हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४)

- ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कचऱ्याची विल्हेवाट लावणेसाठी मौजे डायघर येथील १८.८९ हेक्टर जमीन उपलब्ध करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी कचरा विल्हेवाटीकरीता प्रकल्प कार्यान्वित करण्याची प्रक्रिया सुरू आहे.
- डायघर येथील प्रकल्प कार्यान्वित होईपर्यंत पर्यायी व्यवस्था म्हणून मौजे शिळ येथील बंद पडलेली खदान सर्व्हे क्र.२१८(अ) वनविभागाकडून प्राप्त करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
- तसेच ठाणे शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरीता खालीलप्रमाणे कचऱ्याच्या प्रकारानुसार प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत.

अ.क्र.	प्रकल्प	क्षमता
१	ग्रीन व गार्डन वेस्ट पासून फ्युएल ब्रिकेटस्	२० टन क्षमता (प्रकल्प कार्यान्वित)
२	किचन वेस्ट पासून बायोसिएनजी	२५ टन क्षमता (प्रकल्प कार्यान्वित)

३	फ्लॉवर वेस्ट पासून खत निर्मिती	०५ टन क्षमता (प्रकल्प कार्यान्वित)
४	Animal Carcases पासून बायोसिएनजी	२० टन क्षमता (प्रकल्प कार्यन्वित करण्यात येत आहे)
५	कचऱ्यापासून मिथेन गॅस निर्मिती (लोढा गृहसंकुल)	५ टन क्षमता (प्रकल्प कार्यान्वित)
६	कचऱ्यापासून मिथेन गॅस निर्मिती (हिरानंदानी इस्टेट)	५ टन क्षमता (प्रकल्प कार्यान्वित)
७	शहरातील वेगवेगळ्या गृहसंकुलात प्रक्रिया प्रकल्प	६० टन क्षमता (प्रकल्प कार्यान्वित)
८	प्लास्टीक वेस्ट पासून ऑईल	५ टन क्षमता (प्रकल्प कार्यन्वित करण्यात येत आहे)
९	डेब्रीज पासून बांधकाम साहित्य	१२५ टन क्षमता (प्रकल्प कार्यन्वित करण्यात येत आहे)
१०	ग्रीन कोकोनेट वेस्ट पासून ब्रीकेटस्	१० टन क्षमता (निविदा प्रक्रियेत)
११	ई-वेस्ट संकलन	०१ टन क्षमता (निविदा प्रक्रियेत)
१२	विकेंद्रित पध्दतीने कचरा विल्हेवाट	३०० टन (स्वारस्य अभिव्यक्ती मागविण्यात येत आहे.)

- विक्रेंद्रित प्रमाणे सुमारे ७६० मे.टन कचरा विल्हेवाट लावण्याची क्षमता निर्माण करण्यात येत आहे.
- ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सुमारे ८०० मे.टन कचऱ्याची निर्मिती होते.

- उक्त सर्व नमूद प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केंद्रीय पध्दतीने १२०० मे.टन व विक्रेंद्रित पध्दतीने ७६० मे.टन असे १९६० मे. टन कचऱ्याचे विल्हेवाट लावण्याची क्षमता निर्माण होणार असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करणेबाबत

(४९) * ४०९७३ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे २५ ते ३० लाख विद्यार्थी स्पर्धा परीक्षेची तयार करीत असून रिक्त होणाऱ्या जागेच्या प्रमाणात परीक्षेसाठी उपलब्ध असलेल्या जागा योग्य प्रमाणात भरल्या जात नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तामिळनाडू सरकार मार्फत रिक्त होणाऱ्या जागा व नवीन निर्माण होणाऱ्या जागा भरण्यासाठी स्पर्धा परीक्षेचे वेळापत्रक वर्षभरापूर्वी जाहीर केले जाते व यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेची पूर्व तयारी करण्यास मदत मिळते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगानेही स्पर्धा परीक्षेचे वेळापत्रक वर्षभरापूर्वी जाहीर करण्याची मागणी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शासनाकडे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) संबंधित प्रशासकीय विभागांकडून प्राप्त मागणीपत्राच्या आधारे जाहिरात प्रसिध्द करुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत विविध/पद संवर्गाकरीता भरती प्रक्रिया राबविली जाते.

(२), (३) व (४) तामिळनाडू लोकसेवा आयोगातर्फे आगामी वर्षाकरीता प्रसिध्द करण्यात करण्यात येणाऱ्या वेळापत्रकामध्ये जाहिरात प्रसिध्द होण्याचा दिनांक, संभाव्य पदसंख्या, परीक्षांचा दिनांक, मुलाखतीचा दिनांक, निकालाचा दिनांक इत्यादी तपशील पूर्वी नमूद करण्यात येत असे, तथापि, यामध्ये उद्‌भवलेल्या अडचणी विचारात घेवून सदर पध्दत सन २०१७ पासून बंद करुन वेळापत्रकात जाहिरात दिनांक व परीक्षा दिनांक नमूद करण्यात येतात.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पुढील वर्षभरात आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक साधारणपणे नोव्हेंबर महिन्यामध्येच उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येते. सद्‌य:स्थितीत तामिळनाडू लोकसेवा आयोग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचे वेळापत्रक सर्वसाधारणपणे सारखेच आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

ठाणे महानगरपालिकेतील रिक्त पदे भरण्याबाबत

(५०) * ४१०३५ श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेत २ हजार पदे रिक्त असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील ८ ते १० वर्षापासून महानगरपालिका सेवेत अनेक कर्मचारी अस्थायी कर्मचारी म्हणून कार्यरत असून त्यांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी अनेक वर्षापासून मागणी करुनही त्यांना सेवेत कायम करण्यात न करता मर्जीतल्या व कनिष्ठ असणाऱ्यांना सेवेत कायमस्वरुपी करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने महापालिकेस पद भरतीस मान्यता देऊनही जाणीवपूर्वक पदभरतीस टाळाटाळ करुन ८ ते १० वर्षे सेवा झालेल्या अस्थायी कर्मचाऱ्यांवर अन्याय करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार अस्थायी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील एकूण ९७१० पदांपैकी २४१२ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) शासन निर्णय दिनांक २३/०७/२००३ नुसार तत्कालीन रोजंदारी/अस्थायी स्वरुपात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्यात आले होते.

तद्नंतर ठाणे महानगरपालिकेने विहित मार्गानेच पद भरती केली आहे.

कर्नाटक राज्य विरुध्द उमादेवी प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने सन २००६ मध्ये दिलेल्या न्याय निर्णयानुसार मंजूर पदांवर केवळ विहित मार्गाने नियुक्ती करण्याबाबत शासनाचे धोरण आहे व त्यानुसार रिक्त पदावर विहित प्रक्रियेचे अनुपालन करून ठाणे महानगरपालिकेने पदभरती करणे आवश्यक आहे, असे कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

चिकलठाणा (जि.औरंगाबाद) येथील विमानतळ विस्तारीकरणाबाबत

(५१) * ४११०६ श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिकलठाणा (जि.औरंगाबाद) येथील विमानतळाचे विस्तारीकरण करण्याबाबत व त्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला भूसंपादन संस्था म्हणून नियुक्त केल्याबाबतचे आदेश शासनाने दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निर्गमित केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने विमानतळ विस्तारीकरणाचा निर्णय घेऊन त्यासाठी रुपये २०० कोटी उपलब्ध करुन देण्याचे जाहीर केले होते, परंतू मागील तीन महिन्यात विमानतळ कंपनी वा शासनाकडून कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे त्यासाठी आता रुपये ६०० कोटी खर्च करावे लागणार असल्याचे दिनांक ५ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद शहर परिसरात शासनाने ३ हजार कोटी रुपये खर्च करुन उद्योजकांसाठी "ऑरिकसिटी" तयार करण्यात येत असून आंतरराष्ट्रीय पातळीवरील उद्योजकांना आकर्षित करण्यासाठी विमानतळ विस्तारीकरणाची मागणी स्थानिक व देशपातळीवरील उद्योजकांकडून अनेक दिवसांपासून शासनाकडे करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय. हे खरे आहे.

(२) औरंगाबाद विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी रुपये २०० कोटी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तथापि, विस्तारीकरणासाठी आवश्यक जमिनीची मोजणी केल्यानंतरच खर्चाचा आकडा निश्चित होईल. सद्य:स्थितीत विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी जमिनीची मोजणी करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, औरंगाबाद कार्यालयाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) विमानतळ विस्तारीकरणाच्या मागणीसंदर्भात निवेदन स्थानिक उद्योजकांच्या संस्थेकडून शासनास प्राप्त झालेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण (पूर्व) परिसरात बाजाराकरिता इमारत उभारण्याबाबत

(५२) * ३९६५० श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाने सन १९९६ मध्ये जाहीर केलेल्या प्रारूप विकास आराखड्यास सन २०१२ साली शासनाची मंजूरी मिळाली असून कल्याण (पूर्व) परिसरात प्रस्तावित आराखड्यात भाजी बाजार, मासळी बाजार व मटण मार्केटसाठी वेगवेगळ्या ठिकाणी आरक्षणे प्रस्तावित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावित आराखड्याला शासनाची मंजूरी मिळण्यापूर्वीच महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने विकास कामांना सुरुवात केलेली असताना कल्याण (पूर्व) परिसरात मात्र आजमितीस भाजी बाजार, मासळी बाजार व मटण मार्केटच्या एकाही आरक्षित जागेवर इमारत उभारण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त महानगरपालिका प्रशासनाने प्रस्तावित मार्केट विकसित न केल्याने कल्याण (पूर्व) येथील लाखो नागरिकांना नाईलाजाने उघड्यावरील भाजीपाला, मासळी व मटण खरेदी करावे लागत आहे तसेच विविध विक्रेत्यांनी आपली दुकाने रस्त्यावर उभारलेली असल्याने वाहतूक कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार बाजाराकरिता इमारत उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२), (३) व (४) कल्याण-डोंबिवली शहराच्या सेक्टर-४ च्या मंजूर विकास योजना कल्याण (पूर्व) या भागामधील आ.क्र.४१४-मासळी मार्केट व मटन मार्केट, आ.क्र.४३४-भाजी बाजार व आ.क्र.४३९-मासळी मार्केट/मटन मार्केट या आरक्षणांचा समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून कल्याण-डोंबिवली

महानगरपालिकेने विकास केला आहे. तसेच आ.क्र. ४१३ भाजी बाजार या आरक्षणाचा बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच विकसित झालेल्या आरक्षणांचा विनियोग करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील प्रभाग अधिकाऱ्यास लाच स्वीकारताना पकडल्याबाबत

(५३) * ४०५८५ श्री.परिणय फुके : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील प्रभाग अधिकारी श्री.स्वप्नील सावंत यांचेविरुध्द तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका, डॉ.नरेश गिते यांचेकडे लाच स्वीकारणे व मागणे अशा असंख्य लेखी तक्रारी केल्या असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिरा-भाईंदर (पश्चिम) येथील नगर भवन येथे उक्त प्रभाग अधिकारी व त्यांच्या चालकास एक लाख रुपयांची लाच स्वीकारताना पकडण्यात आले असून अशा प्रकारे आयुक्त व त्यांच्या कार्यालयातील अधिकारी यांच्या संगनमताने लाच मागून मोठ्या प्रमाणात संपत्ती जमा केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित प्रभाग अधिकारी व त्यांना सहकार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) श्री.स्वप्नील सावंत, प्रभाग अधिकारी, मिरा-भाईंदर महानगरपालिका हे अनधिकृत बांधकामांना संरक्षण देत असल्याच्या तक्रारी आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झाल्या, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील श्री.स्वप्नील सावंत, प्रभाग अधिकारी यांचे सांगणेवरून चालक, खाजगी इसम राजु ऊर्फ राजेंद्र सुरेश खेडेकर यांना तक्रारदार श्री.मुन्नवर शेख यांचेकडून रूपये १ लाख लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले.

त्यानुषंगाने प्रभाग अधिकारी व त्यांचे चालक यांचेविरूध्द भाईंदर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं. ४१७/२०१७, लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ कलम ७, १२, १३(१)(ड) सह १३(२) अन्वये दाखल करण्यात आला असून, सदर प्रकरणाचा तपास सुरू आहे.

श्री.स्वप्नील सावंत, प्रभाग अधिकारी यांना दिनांक २६/१०/२०१७ पासून निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

घाटकोपर (मुंबई) येथील आगीच्या घटनेबाबत

(५४) * ३८६२० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्‌या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, प्रा.अनिल सोले : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर (मुंबई) परिसरात एका साबणाच्या गोदामाला व साकीनाका अंधेरी (प.) येथील भानू फरसाण बनविणाऱ्या कारखान्याला आग लागल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेनंतर महानगरपालिकेने उपहारगृहांचा उपयोग निवासासाठी करता येणार नसल्याचे आदेश मुंबईतील सर्व उपहारगृहांना दिले असून सद्‌य:स्थितीत ज्या उपहारगृहांना निवासासाठी दिलेले परवाने रद्द करण्यात येणार असल्याचेही माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मुंबई अग्निशमन दलाने मुंबईतील इमारतींमधील अग्निशमन यंत्रणेच्या केलेल्या तपासणीत सुमारे ४ हजार ६४७ इमारतीतील अग्निशमन यंत्रणा निकामी झाल्या असून नियमानुसार इमारतीतील अग्निशमन यंत्रणेचे दर सहा महिन्यांनी ऑडिट करून संबधित विभागाकडे माहिती जमा करणे बंधनकारक असतानाही अनेक सोसायट्यांनी अशा प्रकारचे ऑडिट केले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) दिनांक २८/१२/२०१७ रोजी घाटकोपर येथील जनता सोप सेंटर या दुकानास व दिनांक १८/१२/२०१७ रोजी साकीनाका, अंधेरी येथील भानु फरसाण मार्ट या दुकानास आग लागली होती, ही वस्तुस्थिती आहे.

(२) मुंबईतील आगीच्या घटनांची दखल घेत स्वयंपाकगृहाचा वापर खाद्यपदार्थ बनविण्या व्यतिरिक्त निवास व झोपण्यासाठी केल्यास परवानाप्राप्त उपहारगृहाचा परवाना तहकुब करण्याचे आदेश आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक ०४/०१/२०१८ रोजी दिले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(३) जानेवारी, २०१५ ते नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील इमारतींमधील अग्निसुरक्षा उपाययोजनांची पाहणी केली असता, ४६४७ इमारतींच्या अग्निसुरक्षा उपाययोजनांमध्ये त्रुटी असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निदर्शनास आले आहे.

(४) व (५) सदर ४६४७ इमारतींना, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अन्वये नोटीस बजावून त्यांना ठराविक मुदतीमध्ये त्रुटींची पुर्तता करण्याचे निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात आले.

सदर इमारतींपैकी ४६३७ इमारतींनी, त्यांना दिलेल्या मुदतीत अग्निसुरक्षा उपाययोजनांच्या त्रुटींची पुर्तता केली आहे.

ज्या १० इमारतींनी त्रुटींची पुर्तता केली नाही त्या इमारतींविरोधात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खटले दाखल करण्यात आले आहेत.

सोलापूर येथे महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या वसाहतीचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत

(५५) * ४०८३५ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथे श्रमसाफल्य योजनेतून तुळजापूर रस्त्यावरील मड्डी वस्तीजवळ ७१ महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी वसाहत बांधण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही वसाहत उभारताना निविदा काढताना येथील घरांच्या खिडक्या, दरवाजे, अंतर्गत रस्ते करणे, रेन हार्वेस्टिंग इत्यादी बाबींचा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे समावेश न केल्यामुळे बांधकाम अपूर्ण अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त वसाहत उभारण्याचा खर्च रुपये १ कोटी ८७ लाखवरुन ३ कोटी ४० लाख रुपयांवर गेला असून कामास कंत्राटदाराने ४ वर्षाचा विलंब केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या वसाहतीची उभारणी विलंबाने करणाऱ्या कंत्राटदारावर व निविदेत त्रुटी ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) ही वस्तुस्थिती आहे. मात्र, सुधारित आराखडयात सर्व आवश्यक गोष्टींचा समावेश करून कामे पूर्ण करून घेण्यात येत आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४)

- बांधकाम खर्चात वाढ झाल्यामुळे शासन अनुदानाव्यतिरिक्त महानगरपालिकेस अधिकचा निधी खर्च करावा लागत आहे.
- महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने मक्तेदारास वेळेवर देयके देता आली नाही त्यामुळे काम पूर्ण होण्यास विलंब झाला आहे.
- विहित मुदतीत काम पूर्ण न केल्याने कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.
- सदर सर्व कामे पूर्ण करून एप्रिल, २०१८ मध्ये संबंधितांना ताबा देण्यात येईल असे सोलापूर महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे विक्रमगड (पाटीलपाडा) (जि.पालघर) येथे अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

(५६) * ४११५८ ॲड.अनिल परब : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे विक्रमगड (पाटीलपाडा) (जि.पालघर) येथील सर्वे क्र. १५७ मध्ये अरुण वामन पाटील, यशवंत पाटील व इतर ६ सामाईक खातेदार असताना यशवंत वामन पाटील व मनोज दामोदर पाटील यांनी ग्रामपंचायतीची कोणतीही परवानगी न घेता दोन मजली अनधिकृत बांधकाम केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त सामाईक ७/१२ वर असलेल्या खातेदारांची परवानगी नसताना वरील जागेमध्ये ७०/२७ ची मोजमापाची दुमजली इमारतीचे बांधकाम केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त अनधिकृत बांधकाम तात्काळ निष्कासित करणेबाबत गटविकास अधिकारी यांनी ग्रामविकास अधिकारी यांना कळवूनही तसेच लोकप्रतिनिधींनी दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी मा.राज्यमंत्री महसूल,

जिल्हाधिकारी, पालघर, तहसिलदार, विक्रमगड व नगरपंचायतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्याकडे वारंवार तकारी करुनही कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त प्रकरणी जबाबदार असणाऱ्या व्यक्तींविरुध्द कारवाई करुन अनधिकृत बांधकाम तात्काळ निष्कासित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) विक्रमगड नगरपंचायत दिनांक ०७/०५/२०१६ रोजी नव्याने स्थापन झाली असून तत्पूर्वी विक्रमगड ग्रामपंचायत अस्तित्वात होती.

विक्रमगड ग्रामपंचायत असताना अशा आशयाची तक्रार श्री.अशोक वामन पाटील यांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्याकडे केली हे खरे आहे.

(२) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने गटविकास अधिकारी, विक्रमगड व तहसिलदार, विक्रमगड यांनी चौकशी केली.

- श्री.यशवंत पाटील यांनी मौजे विक्रमगड येथील स.क्र.१५७ मध्ये घर बांधकामासाठी तत्कालीन ग्रामपंचायतीकडे परवानगी अर्ज केला होता.
- सदर अर्जासोबत त्यानी २००४ च्या ७/१२ उताऱ्यावर नमूद श्री.अरुण वामन, श्री.अशोक वामन व श्री.आत्माराम वामन पाटील या तीन खातेदारांचे संमतीपत्र जोडले होते.
- त्यानुसार तत्कालीन ग्रामपंचायतीने श्री.यशवंत पाटील यांना गट क्र.१५७ वरील क्षेत्रात ३०.४० चौ.फुट घर बांधकाम करण्यासाठी दिनांक १३/१०/२००७ रोजी परवानगी दिली.
- श्री.यशवंत पाटील यांना ३०.४० चौ.फुट एवढी बांधकाम परवानगी दिली असताना त्यांनी ७०.२७ चौ.फुट इतके बांधकाम केल्याचे तसेच सदर बांधकाम करण्यापूर्वी बिनशेती परवानगी घेतली नसल्याचे चौकशीत निष्पन्न झाले.

- सदर मिळकत सद्या श्रीमती ज्योती मनोज पाटील व श्री.मनोज दामोदर पाटील यांच्या नावे असल्याची ग्रामपंचायत दप्तरी नोंद आहे.

(३) माहे मे, २०१६ मध्ये तत्कालीन विक्रमगड ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर झाल्याने तहसिलदार, विक्रमगड यांनी सदर अनधिकृत बांधकाम प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत दिनांक ०५/०८/२०१७ रोजी नगरपंचायतीस कळविले आहे.

(४) विक्रमगड नगरपंचायतीने महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतूदीनुसार अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत सर्व संबधितांना दिनांक २७/०२/२०१८ रोजी नोटीस दिली असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात गैरव्यवहार झाल्याबाबत

(५७) * ४०९९१ श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिका येथील हरित क्षेत्र घटविण्यावरुन व सोईनुसार आरक्षण करुन घेणेसाठी अब्जावधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहराचा विकास आराखडा दिनांक ११ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासन आदेश काढून भविष्यातील २० वर्षांचा विचार करुन अंतिम मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, २० वर्ष पूर्ण झाल्याने वाढीव मुदतीकरीता महानगरपालिकेने शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त महानगरपालिकेचा नवीन विकास आराखडा मुदत संपल्यावरही प्रसिध्द करण्यात आलेला नसून सुधारित आराखडा तयार करणारे आधिकारी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान कार्यमुक्त होऊन सुध्दा प्रारुप आराखडा स्वत:कडे ठेऊन विकासकाशी आणि जमीन मालकाशी आर्थिक व्यवहार पूर्ण करुन माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान प्रारुप विकास आराखडा प्रसिध्द केला, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) अश्या स्वरुपाची तक्रार, वृत्तपत्र कात्रणासह शासनास प्राप्त झाली आहे.

(२) नाही.

(३) नाही.

(४) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ अन्वये प्रारुप सुधारित विकास योजनेचा इरादा घोषित केल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम २६ अन्वये सदर प्रारुप विकास योजना प्रसिध्द करण्याची मूळ मुदत २ वर्षाची असून, महानगरपालिकेने विनंती केल्यास त्यास मुदतवाढ देण्याची तरतूद आहे. तत्कालीन नगर रचना अधिकारी हे दिनांक १०/१०/२०१७ रोजी महानगरपालिकेमधून कार्यमुक्त झाले असून, प्रारुप विकास योजना नकाशा बंद लिफाफ्यामध्ये गोपनीय स्वरुपात तत्कालीन नगर रचना अधिकारी यांनी दिनांक ०७/०२/२०१८ रोजी महानगरपालिकेकडे सुपुर्द केला आहे. सदरची प्रारुप विकास योजना कलम २६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली नाही.

(५) प्राप्त तक्रार अर्जाचे अनुषंगाने आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा अहवाल दिनांक ०६/०३/२०१८ च्या पत्रान्वये मागविण्यात आला आहे. सदरचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील फेरीवाल्यांचे चुकीच्या पध्दतीने पुनर्वसन केल्याबाबत

(५८) * ३८७९८ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील फेरीवाले, पथारीवाले व स्टॉलधारकांचे चुकीच्या पध्दतीने पुनर्वसन केले जात असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त शहरातील फेरीवाले, पथारीवाले व स्टॉलधारकांचे व्यवसाय होतील अशा ठिकाणी पुनवर्सन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

तथापि, पुणे शहरातील फेरीवाले, पथारीवाले आणि स्टॉलधारकांचे पुणे महानगरपालिका चूकीच्या पध्दतीने पुनर्वसन करण्याचा प्रयत्न करीत आहे, मासिक शुल्क बंद करून प्रतिदिन शुल्क आकारण्यात येत असून पथ विक्रेता अधिनियमानुसार फेरीवाल्यांचे योग्य जागेवरच पुनर्वसन करणे आवश्यक आहे अशी मागणी जाणीव संघटनेने आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्याकडे केली आहे, अशा स्वरूपाची बातमी स्थानिक वृत्तपत्रामध्ये दिनांक २७/१२/२०१७ रोजी प्रसिध्द झाली होती.

(२)

- फेरीवाल्यांच्या संदर्भातील धोरणाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०९/०९/२०१३ रोजी दिलेल्या आदेशातील मार्गदर्शक तत्वानुसार पुणे शहरात एकूण ३० सदस्यांची शहर फेरीवाला समिती स्थापन करण्यात आली होती.
- तद्नंतर पथ विक्रेता अधिनियम-२०१४ मधील तरतूदीनुसार पुणे शहरातील २८२४५ फेरीवाल्यांचे अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून संगणकीय बायोमेट्रीक सर्वेक्षण करण्यात आले असून त्यापैकी १६१७४ फेरीवाल्यांना व्यवसाय प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आहे.

- नोंदणीकृत फेरीवाल्यांचे नो-हॉकर्स झोनमधून इतरत्र रस्ता पदपथावर पुनर्वसन करण्यासाठी एकूण ४३२ नियोजित हॉकर्स झोनची ठिकाणे निश्चित करून त्यास शहर फेरीवाला समिती व प्रभाग समित्यांची मान्यता घेतली आहे.
- त्या अनुषंगाने अशा जागांवर अंदाजे ७ हजार नोंदणीकृत पथ विक्रेत्यांचे पुनर्वसनाचे काम चालू असून ते अंतिम टप्प्यात आहे. तसेच उर्वरित ९१७४ पथ विक्रेत्यांकरीता जागा निश्चित झालेल्या नाहीत. सदर जागा निश्चित झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे प्रयोजन आहे.

पुणे महानगरपालिकेमध्ये फेरीवाल्यांसाठी यापूर्वी असलेले प्रतिमहा मासिक शुल्क अत्यल्प असल्यामुळे तसेच व्यवसाय स्थान मुल्यानुसार सदरचे दर सुधारित करून दिनांक १९/१२/२०१३ रोजी खालीलप्रमाणे प्रतिदिन आकारण्यास प्रारंभ केला आहे :-

वर्ग-अ (+) - रुपये २००/-
वर्ग-अ - रुपये १००/-
वर्ग-ब - रुपये ५०/-
वर्ग-क - रुपये २५/-

- तसेच वाढता इंधन व प्रशासकीय खर्च तसेच अनधिकृत व्यवसायिकांवर ठेवावयाचे नियंत्रण या सर्व बाबींचा विचार करून अनधिकृत स्टॉलधारकांचा दंड वाढविण्यात आलेला आहे.
- त्यामुळे पुणे शहरातील फेरीवाले, पथारीवाले व स्टॉल धारकांचे चुकीच्या पध्दतीने पुनर्वसन केले जाते अशी वस्तुस्थिती नाही.
- फेरीवाला जागांबाबत अथवा परवाना शुल्काबाबत शहरातील फेरीवाले तसेच त्यांच्या संघटना/प्रतिनिधी यांच्याकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या तक्रारींचे निरसन केले जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

अंधेरी (पूर्व), मुंबई येथील हबटाऊन सोलारिस या व्यावसायिक इमारतीत चटई क्षेत्रात गैरव्यवहार झाल्याबाबत

(५९) * ३९२६५ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व), मुंबई येथील हबटाऊन सोलारिस या व्यावसायिक इमारतीत एलव्हेशन प्रोजेक्शन (Elevation Projection A.H.U), सर्विस एरिया, रेप्युज एरिया (Service area, refuge area) इत्यादी वापराकरीता चटईक्षेत्र निर्देशकांमध्ये (FSI) सूट असलेले क्षेत्रफळ प्रत्यक्ष चटई क्षेत्रात अनधिकृतरित्या समाविष्ट केल्यामुळे १ लाख चौरस फुट क्षेत्रफळाच्या मर्यादेचे उल्लंघन होऊन गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या के/पू. विभागाने सदर इमारतीची पाहणी केली असून मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम करुन क्षेत्रफळ मर्यादेचे उल्लंघन केले असल्याचे कार्यकारी अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना कळविले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना पत्र पाठवून कारवाई करण्याची मागणी केली असतानाही सदर मागणीकडे त्यांनी दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, १ ते ९ मजल्यावरील बांधकामात क्षेत्रफळ मर्यादेचे उल्लंघन झाले असल्याचे निदर्शनास आल्यानंतर व तक्रार प्राप्त झाल्यानंतरही १०, ११ व १२ या मजल्यांचे वाढीव बांधकाम करण्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी परवानगी दिली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करुन क्षेत्रफळ मर्यादेचे उल्लंघन केल्याबाबत संबधित विकासकावर व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश महेता : (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

सदर प्रकरणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक १७/११/२०१७ च्या पत्रान्वये विकासकावर MRTP अधिनियमातील कलम ५३(१) अंतर्गत नोटीस बजावण्यात आली असून पुढील कार्यवाही चालू आहे.

या योजनेमध्ये व्यावसायिक इमारतीला दिनांक २१/०१/२०१६ रोजी पुढील बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दिनांक ०८/०९/२०१६ रोजीच्या पत्रान्वये विकासकाने क्षेत्रफळाचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यानंतर विक्री घटकाच्या बांधकामास कोणत्याही परवानग्या देण्यात आलेल्या नाहीत असा प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मानखुर्द (मुंबई) रेल्वे स्थानकात वाहतुकीसाठी पूल उभारण्याबाबत

(६०) * ३९३४९ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द (मुंबई) रेल्वे स्थानकात ये-जा करण्यासाठी पूल नसल्याने स्थानिक नागरिकांना रेल्वे पटरी ओलांडून प्रवास करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त स्थानकात पूल उभारण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) मानखुर्द रेल्वे स्थानकात ये-जा करण्यासाठी रेल्वेचे तीन पादचारी पुल अस्तित्वात आहेत.

तथापि, रेल्वे प्रवाशांव्यतिरिक्त इतर पादचाऱ्यांना मानखुर्द रेल्वे स्थानक ओलांडण्यासाठी नवीन पादचारी पूल बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रस्तावित केला आहे.

सदर पादचारी पूल रेल्वे लाईनवर येत असल्यामुळे सदर पुलाचे बांधकाम मध्य रेल्वे प्रशासनामार्फत करण्यात येणार आहे.

(२) व (३) मानखुर्द रेल्वे स्थानकावर नवीन पादचारी पूल उभारण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

- रेल्वे प्रशासनाच्या अंदाजपत्रकानुसार सदर कामासाठी येणाऱ्या खर्चासाठी रुपये ३.११ कोटी इतकी रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रेल्वे प्रशासनाकडे अदा करण्यात आली आहे.
- सदर कामासाठी स्थानिक लोकांचा होणारा विरोध लक्षात घेता, स्थानिक रहिवाशांशी समन्वय साधून सदर पादचारी पूल बांधण्याची कार्यवाही मध्य रेल्वे प्रशासनामार्फत सुरु आहे.

मालेगाव (जि.नाशिक) येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करणेबाबत

(६१) * ३९४८५ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २८३८२ ला दिनांक ५ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) हे शहर कायदा व सुव्यवस्थेच्यादृष्टीने अतिसंवेदनशील असल्यामुळे तेथील आजुबाजूच्या परिसरात व लोकसंख्येत वाढ झाल्याने मालेगाव येथे अस्तित्वात असलेल्या पोलीस ठाण्याच्या संख्येत प्रभाग, जागा, लोकसंख्या यांच्याप्रमाणात नवीन पोलीस ठाणे निर्मिती प्रस्तावित करुन त्यासह स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबतचा सुधारित परिपूर्ण प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही पोलीस अधिक्षक, नाशिक (ग्रामीण) व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यास्तरावरून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी पोलीस आयुक्तालय स्थापन करणेसंदर्भात पोलीस अधिक्षक, नाशिक (ग्रामीण) व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यास्तरावरील कार्यवाही पूर्ण होऊन सदरहू प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार नविन पोलीस ठाणे व पोलीस आयुक्तालय स्थापन करणेसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण यांनी मालेगांव पोलीस आयुक्तालय निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र यांना सादर केला होता. सदर प्रस्तावामध्ये काही त्रुटी असल्याने सदर त्रुटींची पुर्तता करुन प्रस्ताव विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र यांच्यामार्फत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयास सादर करण्यात येणार आहे. तथापि, मालेगांव पोलीस आयुक्तालय निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पापडखिंड धरणातून (ता.वसई, जि.पालघर) बेकायदेशीरपणे पाणी उपसा होत असल्याबाबत

(६२) * ३९६७४ श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार शहराला पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या पापडखिंड धरणातून (ता.वसई, जि.पालघर) बोअरिंगद्वारे पाणी चोरी होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशीर पाणी उपसामुळे धरणातील पाणी साठा कमी झाल्याने बेकायदेशीर पाणी उपसा थांबविण्याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) पापडखिंड धरणातून बोअरिंगद्वारे पाणी चोरी होत असल्याची बाब निदर्शनास आली नसल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

परंतु पापडखिंड धरणापासून ४०० मी. वर खाजगी मालकीच्या जागेत बोरवेल मधून पाणी उपसा होत असल्याबाबत स्थळ पाहणी दरम्यान वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या निदर्शनास आले आहे.

याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत आवश्यक कार्यवाही करावी अशा सूचना आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पोलिसांना दर्जेदार बुलेटप्रुफ जॅकेट पुरविण्याबाबत

(६३) * ४०९८२ श्री.जयंत पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलिसांना बुलेटप्रुफ जॅकेटच्या खरेदीसाठी गृह विभागाकडून रुपये १७ कोटी मंजूर करण्यात आले असून सीमा शुल्क करात सुट न मिळाल्याने ५ हजार बुलेटप्रुफ जॅकेटऐवजी ४,६३४ बुलेटप्रुफ जॅकेटस् मिळाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कानपूर येथील एमकेयु कंपनीने महाराष्ट्र पोलिसांना निकृष्ट दर्जाचे बुलेटप्रुफ जॅकेट पुरविल्याचे दिनांक ५ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार निकृष्ट दर्जाचे बुलेटप्रुफ जॅकेट पुरविणाऱ्या कंपनीवर कारवाई करून पोलिसांना दर्जेदार बुलेटप्रुफ जॅकेट पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) वित्तीय मान्यतेच्या मर्यादेत सीमा शुल्क मध्ये सुट न मिळाल्याने ४६१४ बुलेटप्रुफ जॅकेटसची खरेदी करण्यात आली आहे, हे खरे आहे.

(२) व (३) पोलीस महासंचालक कार्यालयाने गृह मंत्रालय, भारत सरकार यांनी ठरवून दिलेल्या विनिर्देशाप्रमाणे बुलेटप्रुफ जॅकेट्सची विहित पध्दतीने खरेदी प्रक्रिया राबवून पात्र ठरलेल्या M/s. M.K.U., Pvt. Ltd, Kanpur यांना पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत. मात्र गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार केंद्रीय न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, चंदीगड येथे घेण्यात आलेल्या चाचणीमध्ये अपात्र ठरलेल्या लॉटमधील १४३२ बुलेटप्रुफ जॅकेट्स नव्याने पुरवठा करण्यासाठी पुरवठादार कंपनीस परत करण्यात आली आहेत. तथापि, उर्वरित पात्र ठरलेल्या ३१२२ बुलेटप्रुफ जॅकेट्सचे राज्यातील संबंधित पोलीस घटकांना वाटपही करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मे.ईलॅण्ड इंडिया प्रा.लि. तारापूर (जि.पालघर) ही कंपनी कामगारांना संरक्षणात्मक साधने पुरवित नसल्याबाबत

(६४) * ४१०३७ श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे.ईलॅण्ड इंडिया प्रा.लि., तारापूर (जि.पालघर) ह्या कंपनीत काम करणाऱ्या कामगारांना धाग्याचा तंतूचा त्रास होऊ नये याकरिता मास्क, आवाजाचा त्रास होऊ नये म्हणून कानातील उपकरण, हातमोजे व गमबूट इत्यादी संरक्षणात्मक साधने पुरविण्यात न आल्याने कामगारांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच कंपनीने कंपनीतील ३५० कामगारांना अचानक कामावरुन काढून टाकल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असून काम केलेल्या कामाच्या दिवसाचा पगारही दिला नसल्याची तक्रार कामगार उपायुक्त, पालघर यांचेकडे दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास तेथील कामगार संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संभाजी पाटील-निलंगेकर : (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे, दिनांक १८/०१/२०१८ रोजी मे.साई एंटरप्रायझेस या कंत्राटदाराने त्यांच्याकडील कंत्राटी कामगारांचा पगार दिला नसल्याचे व अंदाजे ३५० कामगारांना उपासमारीची वेळ आल्याची तक्रार कामगार उप आयुक्त, पालघर कार्यालयास दिली होते. तद्नंतर दिनांक २५/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये माजी आमदार व संस्थापक श्रमजीवी संघटना, महाराष्ट्र यांनी देखील त्याच पध्दतीची तक्रार कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयास सादर केली होती.

(३) सदर तक्रारीस अनुसरून कामगार संघटना प्रतिनिधी, संबंधित कंत्राटदार तसेच मे.ईलॅण्ड इंडिया प्रा.लि. या व्यवस्थापन प्रतिनिधी यांचे सोबत कामगार उप आयुक्त, पालघर कार्यालय येथे वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या. सदर कंत्राटदाराने त्यांचेकडील कंत्राटी कामगारांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम, भविष्य निर्वाह निधी विभागाकडे जमा केलेली नसल्याने, मुख्य मालकाने जून, २०१७ (सुमारे १९० कंत्राटी कामगारांची) नोव्हेंबर, २०१७ व डिसेंबर, २०१७ (सुमारे १५ ते १७ कंत्राटी कामगारांची) या ३ महिन्याची वेतन देयके राखुन ठेवली असल्याचे बैठकीचे वेळी निदर्शनास आले. तद्नंतर दिनांक १४/०२/२०१८ रोजी ३ महिन्यांच्या वेतन देयकाबाबतची रुपये १३,६७,७२२/- इतकी रक्कम कंत्राटदारास व्यवस्थापनाने अदा केली असून कंत्राटी कामगारांचे वेतन कंत्राटदाराने वेळेतच अदा केली असल्याचे व त्यांचे वेतन थकित नसल्याचे आढळून आले तसेच वेतन न मिळाल्याबाबत कंत्राटी कामगारांची कोणतीही तक्रार उप आयुक्त, पालघर यांच्या कार्यालयास प्राप्त झालेली नाही. कंत्राटदाराच्या म्हणण्यानुसार त्यांचेकडील कंत्राटी कामगारांचे थकित भविष्य निर्वाह निधीची रक्कम संबंधित विभागाकडे भरणा केलेली आहे व त्याबाबतची कागदपत्रे व्यवस्थापनास सादर केलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.